म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. ५७७.

२

ग्रंथ संग्रहालय
सं. क्र.
ना.

लेखक - रामचंद्र भिकाजी गुंजीकर

२०।११।५५

दोन खंडीत पुस्तक
मिळत नाही.

# भ्रमनिरसन.

## भाग पहिला.

श्रीमंत महाराज शिवाजीराव होळकर यांच्या संबंधानें वाटेल तसे लेख लिहून इंदुरस्थ प्रजेची कळकळ बाळगणाऱ्यांत विक्षिप्त वर्तमानपत्र स्वतःस अग्रेसर समजत आहे; त्यांत जे लेख प्रसिद्ध होतात, त्यावरून जर होतच असेल तर, फक्त विक्षिप्त लोकांचा ग्रह शिवाजीराव महाराजासंबंधानें वाईट होत असेल; या पलिकडे त्या पत्रानें देशाची तर राहूंच द्या, परंतु एखाद्या सुसमाजाची सेवा बजाविली आहे असें मला वाटत नाहीं. तथापि त्यांच्या लेखाविरुद्ध कोणी कांहीं ह्मणत नाहीं, ह्मणून ते खरे असे मानणारे जे लोक असतील, त्यांना खऱ्या गोष्टी कळाव्या ह्यासाठीं विक्षिप्तकारांच्या लेखांचा विचार करणें आहे. स्वतः विक्षिप्तकारच कबूल करतात कीं, त्यांना ज्या हकिकती कळतात त्या त्यांच्या बातमीदारांकडून कळतात. लेखक स्वतः त्या दरबारी राहिलेले आहेत किंवा त्यांनीं त्या राजकारभाराचा अनुभव घेतला आहे असें मुळींच नाहीं. यावरून त्यांनीं स्वतः जीं मतें दिलीं आहेत, आणि जितके लांब लांब लेख लिहिले आहेत, ते श्रवण, आणि फारच झालें तर स्वतःची युक्ति ह्यापेक्षां विशेष विश्वासाच्या मार्गें माहिती मिळवून लिहिले नाहींत, हें कोणीही कबूल करील. हीच स्थिति अशींच जीं इतर वर्तमानपत्रें इंदूराधिपतींच्या विरुद्ध लिहून स्वतःची लेखणी विटाळीत असतील त्यांची होय. दिसणाऱ्या गोष्टी तशाच असतात असें नाहीं. ह्मणून डोळयानें पाहिलेली गोष्ट सुद्धां खोटी असते हें शिक्षण देण्यास लहान मुलांना त्यांच्या आई कांहीं चमत्कारिक गोष्टी सांगतात. " कान आणि डोळे यांत चार बोटांचें अंतर

असतें " हें प्रचारांत नेहमीं बोलण्यांत येतें. परंतु ज्या ह्मणी राजे बोलण्यांत येतात, त्याचा विचार मनुष्य प्रथम करीत नसून ज्या वेळेस त्याच्यावर संकट येतें त्या वेळेस मात्र त्याचा अर्थ तो करीत बसतो. इतकें लिहिणें, "अनुभवाशिवायच्या गोष्टी अज्ञानमूलक असतात" ह्या वाक्याचें स्थापित असलेलें महत्व वाचकांच्या लक्षांत पुनः आणून देण्यास पुरें आहे. जे सिद्धांत ह्मणून ठरले आहेत, त्यांच्या संबंधांत हें ह्मणणें नाहीं; परंतु एखादा नवीन सिद्धांत बनविण्यास ह्या लिहिण्याचा विसर होतां कामा नये. स्थितीपरत्वें बदल होणाऱ्या गोष्टींचा अनुभव जसा एखाद्याला येतो, तसाच दुसऱ्याला येतो असें कदापि घडत नाहीं. मनुष्याचें बरें वाईट पण स्थितीवर अवलंबून असतें. जो मनुष्य सर्वांच्या दृष्टीनें शांत वृत्तीचा ठरलेला असतो, व जो मोठा न्यायाधीश ह्मणून वाखाणला जातो, तो अपराधी वर्गास तसाच दिसत नाहीं. व्यक्तिमात्राची प्रकृति भिन्न आहे हें ज्यास माहीत असेल त्याला ही गोष्ट सुद्धां माहीत असेल कीं, प्रकृतींत कारणपरत्वें बदल होत असतो. यावरून एकच अनुभव प्रत्येकाला सारखाच होतो असें नाहीं. ही गोष्ट मनुष्याची व त्याच्या कृतीची परीक्षा करण्यासाठीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

जो विषय ज्या दृष्टीनें पहावा तो त्याप्रमाणें दिसतो. आपला ग्रह बदलावा ह्मणजे स्वाभाविक रीतीनें समोरच्या मनुष्यानें केलेल्या कृतिबद्दल आपल्याला बरें वाईट वाटतें. न्याय व अन्याय ठरवण्याच्या दृष्टींत तर फारच भिन्नता असते. अशी गोष्टच सांपडावयाची नाहीं कीं, ज्या कामांत विक्षिप्रकार न्याय झाला ह्मणून ह्मणतील त्यांत न्याय झाला ह्मणून सर्व लोक ह्मणतील. हिंदुस्थान देशांत समाज फार आहेत आणि त्यांचें हित निरनिराळ्या गोष्टींत आहे. हिंदुस्थान देशाचा प्राचीन इतिहास पाहिला ह्मणजे सहज कळून येईल कीं, या देशांत सामाजिक सुधारणा ह्मणून सर्वांना एकच रीत पसंत पडली नाहीं. सामाजिक विषयांत लोकांची एकाग्रता करण्यास जसजसा प्रयत्न होतो तसतशा त्या बाबतींत दिशा निराळ्या होत जातात. तशांतून इंग्रज

लोकांच्या अथवा ज्यावेळेपासून हिंदुस्थानवासी जनांचा समागम परकीयांशीं झाला आहे, त्यावेळपासून स्थितीरीतींत अनेक बदल झाल्यानें व अनुकूळता प्रतिकुलतेच्या प्रमाणानें ह्या गोष्टी सर्वांना सारख्या लागू होऊं शकत नाहींत. इंग्रजांच्या राज्यांतील हायकोर्टासारख्या न्यायालयांतून झालेल्या निकालाला सुद्धां अन्याय, चुकता न्याय, वगैरे विशेषणें दृष्टिवैचित्र्यामुळें लादलीं जातात. समदृष्टीनें पाहणारा मनुष्य जगांत विरळा. तशांतून " माझ्या खात्रीच्या माणसांनीं हें लिहिलें " या विश्वासावर झोंके खाणाऱ्या हट्टास व पेटलेल्या विक्षिप्तकारांची न्यायदृष्टी समान ठरवितां येत नाहीं. बातमीदाराची योग्यता व तो कोठल्या पक्षाचा आहे ही गोष्ट फार बारीक रीतीनें पाहिली पाहिजे. विक्षिप्तकार समदृष्टीचे आहेत असें झटले तर ज्या गोष्टी साध्या भाषेनें जगापुढें ठेवतां येतात, त्या काळ्याबेंद्ऱ्या शब्दांनीं रंगवून लोकांचीं मनें ओढण्यासाठीं त्यांनीं कां झटावें? आजपर्यंत इंदूर प्रकरणांतच नव्हे, तर हें वर्तमानपत्र सुरू झालें त्या दिवसांपासून ज्या ज्या विषयांत त्यांनीं स्वतःचीं मतें नमूद केलीं असतील, व ज्या विरुद्ध लेखकांनीं स्वतःचीं विधानें मांडलीं असतील त्यापैकीं एकाही विषयांत त्यांची चुकी पडली नसेल असें ह्मणतां येईल काय? मग त्यांनीं वादविवाद करीत बसलें असतां, ज्या गोष्टींत स्वतःला हार मिळाली असेल, ती खरी गोष्ट स्विकारून स्वतःच्या वाचकांस आपलें अमूक मत चुकीचें होतें तें मला वादविवादतां कळलें आहे असे दाखविलें पाहिजे होतें. तसें एकही उदाहरण विक्षिप्तकारांनीं अथवा त्यांच्या पक्षकारांपैकीं एखाद्यानें तरी दाखवावें म्हणजे ते सत्यवादी आहेत असें मानतां येईल, व आम्ही त्यांस धन्यता देऊं. वर्तमानपत्रकारांचा संबंध आजकाल सामाजिक विषयाशीं जास्त राहिला पाहिजे. राजकीय प्रकरणांत ब्रिटिश राज्याचें शहाणपण व प्रजावात्सल्य कायम आहे तोंपावेतों वर्तमानपत्रकारांच्या खऱ्या मागणीचा विचार हिंदुस्थानसरकार ती मागणी वर्तमानपत्रें म्हणजे लोक मागतात इतक्यावरच कबूल करीत नाहींत, तर हिंदुस्थानसरकारची, दया, न्याय व वेळ पाहून मदतीचें बोट देण्याची खुबी याच्या प्रमाणावर त्या मागणीचा विचार होतो

विक्षिप्तकारांची कृति 'इंदूरप्रकरण' म्हणून लेख लिहिण्यांत कुचेष्टा करून प्रतिष्ठा वाढवावी याच पंथाची दिसते. परोपकारांत खरी कळकळ कृतींत दिसली पाहिजे. विक्षिप्तकारांच्याच मताप्रमाणें त्यांना मिळत असलेली बातमी खरी आहे असें घटकाभर मानलें तरी पण ती प्रसिद्ध करण्यांत त्यांचा हेतू इंदूरचें कल्याण करण्याचा किंवा स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याचा आहे याचा निर्णय सहज करतां येण्यासारखा आहे. एखाद्या मनुष्याचा वाईट प्रकार आपल्या लक्षांत आला आणि आपल्या मनांत त्याला सुधारण्यास दोन गोष्टी सांगावेंसें आलें, तर प्रथम त्याला त्याची इभ्रत न जाई अशा रीतीनें त्या गोष्टी सांगतो. आपल्या सांगण्यानें तो ऐकत नाहीं, असें ठरलें तर पुढें चारचौघां सभ्य गृहस्थांत त्याची कानउघडणी करतो, आणि शेवटीं निरुपायानें तो मजकूर प्रसिद्ध करतो. सुधारण्यांत आपला मानस त्याला वाईट ठरविण्याचा नसावा, तर त्याच्या सुधारणेकडेस आपलें लक्ष्य विशेष राहिलें पाहिजे. विशेष हें आहे कीं, जो इतरांस सुधारण्याचा अधिकार धारण करतो त्याच्या अंगीं सहिष्णुता व कोठें काय चुकतें आहे हें कळून येण्याचें ज्ञान असलें पाहिजे. शिवाय ज्या गोष्टीविषयीं तो स्वतःचें बरें वाईट मत ठरवितो तिच्या सर्व बाजू त्यानें ज्या त्या विषयांच्या पूर्ण ज्ञानदृष्टीनें पाहिल्या पाहिजेत. अशा तऱ्हेनें उभयपक्षांच्या साधकबाधक बाजूंचा विचार करून नंतर प्रत्येकानें स्वतःचें मत प्रगट करावें आणि तें मत प्रगट करण्यांत "शुद्ध मनोभाव" कायम राहिला पाहिजे. असें वर्तन ठेवण्याजोगीं साधनें नसल्यावर वर्तमानपत्रानें वर्गणीदारांस व्यापारधंदा व सामाजिक विषयावर जी कांहीं माहिती द्यावयाची असेल ती पूर्ण देत जावी. उगाच त्या बापड्यांस नसती भुरळ घालून, लोक खुष आहेत अथवा त्यांची संख्या वाढली ( मग ते कसेही असोत ) व पत्र जगमान्य होत चाललें, आम्ही हें संस्थान हलविलें वगैरे ऐट मिरविणें लाजीरवाणें होय. तमाशा पाहण्यास फार लोक जमतात आणि हरीकथेस गर्दी नसते, म्हणून तमाशा हरिकथेपेक्षां चांगला काय ? लावण्या, तरुणीशि-

क्षणसारखे फार्स व अशाच बीभत्स पुस्तकांच्या पुष्कळ प्रती खपतात व तत्वज्ञान, इतिहास वगैरे विषयांचीं पुस्तकें कमी खपलीं जातात, या मुद्यावर वरील अचकट विचकट पुस्तकें जगमान्य ह्मणावीं काय ?

विक्षिप्तपत्रकारास प्रथम ज्या वेळेस इंदूर राज्यांतील वाईट प्रकार कळला त्या वेळेस त्यांनीं महाराजांच्या कामदारांस तो प्रकार कळवून त्यावर स्वतः माहिती मिळवून नंतर ह्या राजकीय विषयाला हात घालावयाचा होता. त्यांनीं महाराज सुधरावे अशा हेतूनें आजपावेतों लिहिलेल्या लेखांत जितक्या सूचना केल्या आहेत, त्या शांत मनुष्याचें सुद्धां डोकें फिरविण्याचा भाषेंत लिहिल्या आहेत. इतकेंच नव्हे तर त्यांनीं निंदा करण्यांत जितकी जागा अडविली आहे, तितकी जागा त्यांच्या मतानें जी खरी हकीकत ठरली ती जशीच्या तशीच देण्यांत अडविली नाहीं. या अशा भाषासरणींत त्यांनीं स्वतःची चांगली बुद्धि कोठें व्यक्त केली आहे ? यावरून स्वतः विक्षिप्तकारांना वर्तमानपत्रकर्ते ह्मणवून घेण्यास किती सुधारलें पाहिजे याचें अनुमान वाचकांस करतां येईल. बहुतेक भाग विक्षिप्तकारांनीं केवळ व्यक्तिमात्राला उद्देशून लिहिला आहे. महाराज स्वतः स्वयंपाक करतात, ते बाहेर जात नाहींत, गोखड्यांत ( बारींत ) बसून असतात, गल्लोगल्ली हिंडतात, वगैरे गोष्टी ज्यांचा संबंध सामाजिक किंवा राजकीय विषयाशीं मुळींच नाहीं, त्या खूप रेलचेल दिल्या आहेत. विक्षिप्तकारांनीं त्यांच्या ज्ञानाप्रमाणें द्यावयाच्या ब-याच गोष्टी दिल्या नाहींत, याचें आह्मांला हसूं येतें ! महाराज पाटलून घालीत नाहींत, साहेबाचा पोषाख करीत नाहींत, लहानशी पांढरी टोपीच घालतात, गाडींतून फिरत नाहींत, अशा कितीतरी महाराजांच्या चुका लिहावयाच्या राहिल्या आहेत ? विक्षिप्तकारांस जेव्हां कांहीं लिहावयाला नसेल तेव्हां त्यांनीं राजपुरुषांच्या अशाही गोष्टी आणखी लिहाव्या, ह्मणजे त्यांना आणखी एक दोन वर्षे वर्गणीदारांची वर्गणी गिळावयाला सांपडेल. व्यक्तिस्वातंत्र्याखालीं ज्या गोष्टी येतात व ज्याचा कोणाशीं संबंध नाहीं, अशा गोष्टींसाठीं विक्षिप्तकारांनीं स्वतःच्या जिवाला त्रास करून घेतला आहे आणि यामुळें त्यांचें प्रथमचें कोतें ज्ञान, पोकळ ऐट, व

स्वातंत्र्याचा गैरसमज, यांस दुरभिमान स्वरूप प्राप्त झालें. अर्थात् ५ वींचा यांचा पक्षाभिमान, दुरभिमान झाला. विक्षिप्तकारांची स्पर्धा, मत्सर झाली. मत्सर आणि पक्षाभिमान हीं आपद्रोगाचीं भयंकर कारणें आहेत हें मुत्सद्दी लोक जाणतच आहेत. पोटच भरण्यासाठीं ज्यांनीं वर्तमानपत्राचा धंदा काढला आहे, त्यांना या गोष्टी स्वप्नांत तरी कशा कळाव्यात ? इंदूर प्रकरण पत्रांतून घेत गेलें, त्यामुळें जी प्राप्ती होण्याची यांना त्यांच्या स्वभावानुरूप आशा असावी, ती सफळ न झाल्यानें या रावांनीं स्वतःची कोल्हेकुइ माजवून स्वतःच्या सभोंवती आणखी कोल्हीं जमविण्याचा प्रयत्न केला, आणि पुढें त्याच्या त्याच लेखासंबंधानें आणखी पैसे मिळविण्यासाठीं इंदूर प्रकरणाचें पुस्तक छापविलें. पुनःपुनः तेच लेख एक्याचवेळीं छापविण्यांत यांना सुधारणा करण्याची कोठली मखी कळली कोण जाणें ! ! यावरून त्यांचा हेतू महाराजांची किंवा राष्ट्राची सुधारणा करण्याचा आहे, किंवा स्वतःची तुंबडी भरण्याचा आहे, हें लक्षांत येतें. इतराचें डोकें सुधारण्यास विक्षिप्तकारांस स्वतःचें डोकें कां फिरवावें लागतें ? कांहीं लोकांना मुळींच डोकीं नसतात, त्यांत विक्षिप्तकारांची आह्मीं गणना करतो, व या पुस्तकांच्या भागांचें साग्र मनन केल्यावर कोणीही साधारण डोक्याचा मनुष्य ही गोष्ट कबूल करील. विक्षिप्तकारांस राजतेज, राज्यकीर्द आणि राज्यक्रांति या विषयांची माहिती असती तर त्यांना महाराज होळकर जुलमी आहेत वगैरे नीचपणाचे आलाप घेण्यांत कांहीं तरी लज्जा वाटली असती. पढित मुर्खांची संख्या अलिकडे फार वाढत चालली आहे. मग हा दोष इंग्रजी शिक्षणपद्धतीचा किंवा पिढीजात अथवा एखाद्या वर्गाची ओळख म्हणून परंपरेनें चालत आलेल्या दुर्गुणाचा होय हें कळत नाहीं. परंतु इतकें खास आहे कीं " घराण्याचा " किंवा " खानदानी " पुरुषाच्या मनावरच शिक्षणाचा ठसा पाहिजे तसा वठतो. विक्षिप्तकारांस निदान राज्यक्रांतींत भाग घेण्यास कधीं तरी संधी सांपडली नाहीं; इतकेंच नव्हे तर वजनदार घराण्याशीं त्यांचा संबंध मुद्धां घडला नाहीं. याचमुळें त्यांना एखाद्यास सुधारण्यास बीभत्स

भाषा वापरावी लागते. अशाच प्रकारचे पोपटपंची विद्वान् समाजांत वाढले म्हणजे समाजाच्या दैनावस्थेस सुरुवात होते.

ज्याला स्वराज्यसुखाचा वारा नाहीं त्याचें दुर्भाग्य; परंतु **विक्षिप्त-कारांनीं** इतरांस दुर्भागी बनविण्याची इच्छा बाळगूं नये. विक्षिप्त पत्राच्या २०-२९ फूट लांब रुंद राज्याचा बंदोबस्त स्वतः विक्षिप्तकार किती राखूं शकतात? व तो राखण्यांत त्यांना काय काय उलाढाली कराव्या लागतात? ह्याचा विचार प्रथम त्यांनीं करावयाचा होता. किती कंपॉझिटर्स त्यांनीं विनाकारण बदलले असतील? कितीएकांचे पगार बुडविले असतील? आणि कितीएकांना शिव्या देऊन जागच्या जागीं हातपाय आपटले असतील? स्वतःच्या कुटुंबराज्यांत त्यांनीं किती उलाढाल्या केल्या असाव्यात? किती वेळा स्वतःच्या प्रत्यक्ष अर्धांगीवर दांत ओंठ खावून धावले असतील? व भाऊबंदकीच्या कामांत त्यांनीं किती खोटे नाटे प्रकार केले असतील? याची कल्पना करणें कठीण नाहीं. त्यांनीं स्वतः अशा तुटपुंज्या स्थितींत कितीएकांकडून चांगलें ह्मणून घेतलें आहे? त्यांना त्यांच्या वडिलांचेच कपडे घालण्यास किती ठिकाणीं कापून दुरुस्त करविणें भाग पडलें असेल? ह्या साधारण गोष्टींचा विचार करण्यास विक्षिप्तकार विसरले! त्यांनीं स्वतःच्या मनाप्रमाणें अथवा स्थितीस अनुसरून अशा कामांत जी व्यवस्था केली असेल ती पूर्वींपेक्षां निराळी झाल्याकारणानें अशा रीतीनें झालेल्या फेरफारीबद्दल लोकांनीं त्यांना माथेफिरू, मतलबी, छिछोर, व भ्याड अशीं विशेषणें दिलीं आहेत किंवा नाहींत? ह्या उलाढाली जर आपल्या चार माणसांच्या कुटुंबांत होतात, तर राज्याच्या विस्तृतेची कल्पना करून विक्षिप्तकार! आपल्या मनाशी डोकें न फिरवितां स्वतःसिद्ध राज्याला स्वतःचें राजतेज कायम ठेवण्यास काय काय करावें लागतें, याचें सारासार प्रमाण काढून पहा. निदान इतकें तरी पहा कीं, विक्षिप्त पत्रासाठीं वर्गणीदार जमविण्यास आपल्याला किती ढोंग करावें लागलें होतें. बातमीदारांनीं लिहिलेला मजकूर किती खरा आहे, ह्याचा विचार विक्षिप्तकारांस सहज करता आला असता, परंतु

एखादाही अंक इंदूर प्रकरणावांचून राहिल्यास स्वतःच्या कर्तृत्वास कमीपणा येईल असा त्यांचा समज झाला असावा. कारण त्यांनीं इंदूर प्रकरण ह्मणून प्रथम सर्व दोष इंदूराधिपतींचा दाखवून स्वतःला पुढें कांहीं लिहावयाला नाहीं असें झालें, तेव्हां मग त्या राज्यांतील कामदार मंडळींचा दोष दाखविण्यास सुरूवात केली. कांहीं अंकांत विक्षिप्तकारांनीं व्यक्तींच्या शरीररचनेवर सुद्धां टीका केली आहे. आणि लोकांची योग्यता जाणण्यास जीं अनुमानें व स्वतःच्या ज्या सामुद्रिकाचा उपयोग केला आहे, त्या सामुद्रिकाच्या योगें विक्षिप्त पत्राच्या शिरावरचे विक्षिप्तकारांच्या प्रतिरूपाचा विचार केला तर त्यांची योग्यता पावविक्या बाव्यापेक्षां जास्त दिसून येत नाहीं. विक्षिप्तकारांस समजून सांगण्यास सौम्य भाषेचा उपयोग होणार नाहीं, कारण त्यांनीं स्वतःची अशीच योग्यता व समजशक्ति त्यांच्या भाषासौंदर्यांत दाखविली आहे. राज्याची व्यवस्था करण्यास जेथें **पार्लमेंट** स्थापन झालेलें आहे तशा ठिकाणीं सुद्धां जे घेडफाजिते होतात तिकडे दृष्टि दिली तर संस्थानांत एक व्यक्तीच्या हातून जो बंदोबस्त होत आहे त्याजबद्दल त्यांची स्तुतीच केली पाहिजे.

विक्षिप्तकारांना महाराजांचा जुलूम तारीख १५ जून सन १८९५ पासून दिसूं लागला. त्यांनीं यापूर्वीं इंदूरच्या प्रजेची कळकळ कां बाळगली नाहीं याचें कारण मुळींच दाखविलें नाहीं. त्यांच्या पुस्तकांत दिलेल्या गोष्टी खऱ्या मानल्या तरी पण त्यांच्याच लिहिण्याप्रमाणें त्या साहा सात वर्षांपूर्वीं घडलेल्या आहेत असें निष्पन्न होतें. अर्थात् त्या गोष्टी तारीख १५ जून सन १८९५ नंतर लिहून महाराजांचा जुलूम दाखविण्यांत एक तर विक्षिप्तकार स्वराज्यद्वेष्टे, किंवा ज्या राजद्रोही लोकांची हकीकत पुढच्या भागांत येणार आहे त्यांच्या टाकलेल्या तुकड्यावर भोंकणारें **टिपू** असावेत. मनुष्याच्या स्वभावांत बदल होतो त्याचीं कारणें शोधल्यावांचून एखाद्यास त्यासंबंधांत दोष देणें योग्य नाहीं. स्वभावांत बदल होतो त्याला सहवास व स्वाभाविक धर्म हीं दोन मुख्य कारणें होत. सहवासांत शिक्षण व वागणूक

यांचा समावेश होतो. वागणुकीचे सामाजिक आणि व्यक्तिनिष्ठ असे दोन भाग आहेत. ह्मणजे वागणुकींत बदल होण्याचा एक मार्ग, मित्र, अनुयायी व वडील मंडळीच्या वर्तनावर अवलंबून असतो. आणि दुसरा मार्ग, स्थितिपरत्वें जी गोष्ट त्याला करणें भाग पडते, त्यावर राहिला असतो. जीं मुलें लहानपणीं शांत स्वभावाचीं दिसतात; तीं पुढें व्रात्य निपजतात, आणि व्रात्य दिसणारीं शांत होतात. अथवा जो तो गुण वाढता अथवा कमी होत जातो. यासाठीं कोठल्याही मनुष्याच्या कृतीचा विचार करण्यापूर्वीं त्याचीं कारणें पाहिलीं गेलीं पाहिजेत. जे लोक आपल्याला आज प्रीय वाटतात ते पुढें अप्रीय होतात. अथवा आपलें आजचें मत उद्यां कायमच राहतें अशी गोष्ट नेहमीं होत नाहीं. यासाठीं मनुष्यस्वभावांत बदल झाल्याचीं कारणें पाहिल्यावांचून नुसता बदल झाला ह्मणून दोष देऊन उपयोग नाहीं. मनुष्याचा स्वभाव नेहमीं शोधक अथवा अनुकरण करणारा असल्यानें त्याला जसजशा नवनव्या दिशा कळतात, तसतसा तो बदलत जातो. कांहीं लोक स्वतःचा अभिमान राखण्यांत आपलें मत खोटें आहे असें कळलें तरी पण तें बदलीत नाहींत. लोक आपणास हंसतील अशी भीति त्यांना असते. कोणाच्याही कृतीचा बरावाईट विचार करण्यापूर्वीं त्याचा स्वभाव समजून घेतला पाहिजे. स्वभाव समजल्यावर हेतू लवकर समजतो. ही गोष्ट जर साधारण लोकांची आहे तर राजाच्या स्थितीचीही कल्पना आपणास करतां येणार नाहीं. मग त्याचा स्वभाव समजून घेणें फार कठीण आहे. असें असतां आपण आपल्या मतलबाकडे दृष्टि देऊन त्याच्या कृतीचा विचार केल्यास आपणास खरी बाजू कधीं कळावयाची नाहीं. श्रीमंत **शिवाजीराव होळकर** यांच्या कृतीविषयीं वर्तमानपत्रकारांनीं ओरड चालविली आहे, परंतु त्यांची कृति घडली असल्यास ती कशी व काय कारणानें व त्यांत महाराजांचे हेतू काय आहेत हें मुळींच समजून घेतलें नाहीं. आपली चूक कबूल करावयाची नाहीं हा मनुष्यस्वभाव आहे; याला अपवाद ह्मणून जीं माणसें असतील त्यांचीच गणना सत्यवादी लोकांत होते. त्यांना खरें बोलण्यांत कांहीं भीति

किंवा लज्जा वाटत नाहीं. कारण त्यांच्या ऐश्वर्याची वाढ पूर्ण झालेली असते. ह्यासाठीं त्यांच्या अंगीं खरेपणा येतो. यावेळीं ही गोष्ट सुद्धां फार महत्वाची समजून लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, लोकांची वृत्ति स्वार्थी होत चालल्यानें अथवा त्यांची हाव वाढत चालल्यानें उपकार स्मरण्याचें महत्व त्यांच्या लक्षांत राहत नाहीं. अशा लोकांवर उपकारांचे गाडे लादले, तरी पण जर एखादी यःकश्चित् गोष्ट त्यांच्या मनासारखी न झाली तर लगेच स्वतःच्या पुरःस्कर्त्यांच्या सर्व उपकारावर कृतघ्नपणाचें पांघरूण घालतात.

आतां श्रीमंत **शिवाजीराव महाराज** यांचा स्वभाव आह्मीं येथें देतों, आणि तो जसा आह्मी ठरवितों; त्याचप्रमाणें आजपावेतों पुष्कळ गर्भश्रीमंत राजपुरुषांनीं, मोठमोठ्या मुत्सद्दी लोकांनीं व परकीयांच्या दरबारांनीं ठरविला आहे. महाराजांच्या स्वभावांत सर्वांत मोठा व प्रसंशनीय भाग खरेपणाचा आहे. हल्लींच्या मनुला मात्र हा भाग नावडणारा झाला आहे ही गोष्ट निराळी. जेथें खरेपणा आहे तेथेंच गर्भश्रीमंति, औदार्य आणि क्रोध आहे. सिंह वनाचा राजा आहे म्हणूनच तो उदार आणि क्रोधी आहे. तो सहसा क्षोभत नाहीं; आणि क्षोभल्यावर हत्तींच्या झुंडीची दाणादाण केल्यावांचून रहात ही नाहीं. समुद्र खवळत नाहीं. खवळला म्हणजे प्रलय करून सोडतो. नाग चिडत नाहीं पण फणा उभारिल्यावर काळसर्प ठरतो. ह्या वाक्याची ज्यास माहिती आहे, त्याला राजतेजाची कल्पना करतां यावी. महाराजांच्या कट्टया शत्रूनीं सुद्धां ही गोष्ट कबूल केलीं आहे कीं, **शिवाजी महाराजाना** खोटें बोलणें बिलकूल आवडत नाहीं. महाराज इंग्रजी शिकले आहेत परंतु लोकांना आशेवर बसवून फसविण्याचा विनय आणि खरें एक असून दुसरें दाखविण्याची **पॉलिसी** ते शिकले नाहींत. देणगी देण्यांत त्यांना समकालीन दुसरा राजपुरुष नाहीं. महाराजांच्या औदार्याला भलतेंच स्वरूप देणाऱ्या विक्षिप्तकारास ह्याबद्दल आह्मीं हांसत नाहीं. याचें कारण कीं, औदार्य गर्भश्रीमंतीवांचून इतरांस कळत नाहीं. दाता देतो त्याला दान घेणारा कोण आहे ह्याची

चिकित्सा करण्याची इच्छा नसते. ईश्वरानें विक्षिप्तकारास न जाणों कोठल्या गर्भदरिद्री घराण्यांत उत्पन्न केलें आहे ! राजे लोकांकडून ज्यांना द्रव्याची मदत होऊन जे श्रीमंत बनतात त्या लोकांचे नशिबीं राजाश्रय असतो; ही गोष्ट निदान समाधानाप्रीत्यर्थ कबूल करावी लागते. **आसुद्दवला नबाब, खंडेराव गायकवाड,** वगैरे दानशूर राजांच्या दातृत्वांत अशाच गोष्टी घडल्या आहेत कीं, त्यांच्या वेळीं जे लोक धनाढ्य झाले त्यांना राजेलोकांनीं कां पैसे दिले याचें शोधल्यानेंहीं कारण सांपडत नाहीं अशीं उदाहरणें घडलीं आहेत. विक्षिप्त वर्तमानकाराची स्थिति एक्या उदाहरणानें चांगली लक्षांत येईल. एका विद्वानाची संभावना करण्याच्या वेळेस **भोजराजानें कालिदासास** स्वतःच्या हातावर केंस कां नाहींत ह्मणून प्रश्न केला. **कालिदासानें** ह्मटलें महाराज ! लोकांना दान करण्यांत आपल्या तळ हातावर केंस उगवत नाहींत. पुन्हां **राजानें** प्रश्न केला कीं, या विद्वानांच्या तळ हातावर केंस कां नाहींत ? कविश्रेष्ठानें उत्तर केलें कीं, दान घेण्यानें त्यांच्या हातावर केंस उगवत नाहींत. **राजानें** तिसरा प्रश्न केला कीं, ह्या इतर लोकांच्या संबंधानें काय ह्मणतां ? कवीनें ह्मटलें कीं, त्यांस कांहीं मिळत नाहीं ह्मणून ते द्वेषभावानें आपले हात चोळतात त्यामुळें त्यांच्या हातावर केंस नाहींत.

विक्षिप्त वर्तमानपत्रकाराच्या नशिबीं **शिवाजी महाराजांच्या** औदार्याचा लाभ नसल्यानें त्यांनीं औदार्याची वाटेल तशी व्याख्या केली ह्मणून औदार्याची योग्यता कमी होणार नाहीं. उलट विक्षिप्तकारांच्या मनाचीच परिक्षा होते. **शिवाजी महाराज** गादीवर बसल्यानंतर त्यांनीं **हळफाळा, चौकीदारीफाळा** हीं उत्पन्नें सोडिलीं. शिपाई लोकांचे दोनशें रुपये पावेतोंचें कर्ज माफ केलें. जकात माफकरून व्यापारवृद्धि केली. लोकांवर नवीन कर न बसवितां म्युनिसिपालिटीची सुधारणा केली; मेडिकल खातें वाढविलें; गोरगरिबांना जेवूं घालण्याचें अन्नछत्र नवीन स्थापिलें. विद्याखातें वाढविलें व फुकट विद्यादान देतात. लोकांच्या कामांचा लवकर निकाल होण्यासाठीं व रयतेची दाद तावडतोब ला-

गावी ह्मणून एक एक जिल्ह्याचे दोन दोन भाग केले; धाडा, दरोडे, रस्तालूट, वगैरे प्रकार अज्जी बंद करण्यासाठीं व रयतेच्या संरक्षणास्तव पोलीसखातें वाढविलें. रय्यत व नोकरांकडून पुष्कळसे नजराणे घेतले जात होते ते बंद केले. नोकर लोकांचे पगार वाढविले. शेतकरी लोकांच्या हिशेबांत सावकारांना व कामदारांना लबाड्या करून पैसे खातां येत होते ते बंद करण्यास पावतीसिस्टम खातें स्थापन केलें. हिशेबीखातें सुधारलें; अर्जदारांस राजद्वारीं असलेला अडथळा दूर केला. अनाथ लोकांसाठीं पुअर हाऊस ( अनाथगृह ) स्थापिलें. वगैरे प्रजाहिताच्या पुष्कळ गोष्टी लक्षावधि रुपये खर्चून व असलेलें उत्पन्न सोडून केल्या. ह्यासंबंधाची पूर्ण माहिती मागाहून देण्यांत येईल. ह्या गोष्टी औदार्याच्या, प्रजावात्सल्याच्या, राजनीतिच्या, व विद्याविभूषित मनाच्या नाहींत असें कसें म्हणतां येईल ? राजा हा प्रजेचा पिता आहे. असें असून ज्यां संस्थानांत सरकार खजिन्यांत पैसा सांठविण्यासाठीं नवीन कामांचा खर्च भागविण्याचा बहाणा दाखवून आरोग्य खातें, जलपुरवठा, विद्यादान, वगैरे राजानें स्वतःच्या खर्चानें केल्या पाहिजेत अशा बाबतींत रयतेवर कर बसविणाऱ्या राज्याधिपतिनीं **श्रीमंत शिवाजीराव महाराजांचा** कित्ता घेतला पाहिजे, असें कोण म्हणणार नाहीं ? **शिवाजीरावांचें** महायशस्वी ब्रीद **स्त्रियांविषयीं पवित्र दृष्टी** हें आहे.

महाराजांच्या खरेपणाविषयीं आतां विचार करूं. " सीक्रसी इज् सिन " चोरटेपणा हेंच पाप होय. ज्या गोष्टी राजरोस करतां येतात, त्या पुण्यमार्गाच्या होत. ते पुण्यमार्ग उघड उघड रीतीनें पत्करता येतात. ज्या गोष्टी महाराजांना गुप्तपणेंसुद्धां करता येण्यासारख्या होत्या व वर्तमानपत्रकारांनीं ज्या गोष्टी महाराजांनीं केल्या म्हणून लिहिलें आहे, त्या गोष्टी घटकाभर महाराजांनीं केल्या असेंच गृहित धरूं, तरीपण त्यावरून महाराजास खरेपणा आवडतो असेंच ठरतें. ज्या गोष्टी यःकश्चित मनुष्यास गुप्तपणें करितां येतात त्या गोष्टी महाराजास तर अशा गुप्तपणें करितां आल्या पाहिजेत कीं, त्यांचा पत्ता सुद्धां कोणास लागूं नये. मग जो जुलूम

महाराजानीं केला म्हणून पत्रकारांनीं महाराजावर अक्षेप घेतले आहेत त्या गोष्टी पत्रकारास निदान त्याच्या बातमीदारांस कळल्या यांत त्या राजरोसपणें केल्या म्हणजे भीतिरहीत मनानें केल्या. असें होतें. आणि त्या त्यांनीं न्यायच समजून केल्या असाव्यात; कारण हें करणें वाईट आहे इतकें कळल्यावर वाटेल तो मनुष्य गुप्त रीतीनेंच तें करील. आतां महाराजांनीं केलेला न्याय ह्या वर्तमानपत्रास अन्याय वाटला, यांत दोष कोणाचा ह्याचा विचार पुढें झाला आहे; परंतु ज्या अर्थी वर्तमानपत्रकारांस किंवा बाहेरच्या लोकांस समजतां याव्या अशा राजरोस रीतीनें महाराजांनीं त्या गोष्टी केल्या आहेत असें हे वर्तमानपत्रकार ह्मणतात त्या अर्थी त्यांच्याच ह्मणण्यावरून महाराजांस वर्तमानपत्राच्या मतें निरपराधी वाटणाऱ्या मनुष्यांस महाराजांनीं जी शिक्षा दिली ती महाराजांनीं त्यांना अपराधी मानूनच दिली आहे हेंही सिद्ध होत आहे. ज्यांच्यावर जुलूम झाला त्यांनीं अपराध केला नाहीं अथवा झालेली शिक्षा अपराधाच्या प्रमाणानें कडक आहे असें वर्तमानपत्रकार ह्मणतात, आणि आम्हीं म्हणतों कीं त्यांना कांहीं गोष्टी जशा झाल्या तशा कळल्या नाहींत अथवा कांहीं गोष्टी अगदींच बनावट लिहिल्या आहेत ह्या दोन्हीं ह्मणण्यांत विरोध काय आहे हें पाहणें अगदीं निराळें होय. महाराजांच्या स्वभावांत खरेपणा आहे ही गोष्ट ठरविण्या पुरताच हा भाग आहे. महाराज इंग्रेजी, संस्कृत वगैरे शिकले आहेत असें वर्तमानपत्रकर्ते म्हणतात तर मग त्यांना हें कसें कळत नाहीं कीं, जो समज साधारण मनुष्यांत असतो तो महाराजांत का नाहीं? महाराज खरे आहेत असें ठरलें, म्हणजे त्यांच्या अंगीं औदार्य आहे, स्वपणा आहे आणि दया आहे हें निराळें सांगणें व्यर्थ आहे. आतां महाराजांचा जुलूम म्हणून जो मजकूर प्रसिद्ध केला आहे त्याचें निरसनही करावयाचें आहे, परंतु त्यांत जर कांहीं तथ्यांश असेल तर त्याचा दोष कोणाकडे आहे हें ठरविण्यास महाराजांच्या मुख्य मुख्य कामदारांची स्थिति पाहिली पाहिजे. महाराजांच्या राज्यांत कामगार व रयतेपैकीं मोठमोठे म्हणून नांवाजलेले सावकार, जमीदार, फार लुच्चे

आहेत ही गोष्ट अगदीं खरी आहे आणि ती किती खरी आहे हें पाहण्यास दुसऱ्या - भागांतील उदाहरणें बस्स आहेत असें आम्हीं मानतों. **ऑलीव्हर क्रॉमवेल** यांनीं इंग्लंडच्या **चार्लस** राजाच्या वेळेस जसा राजद्रोही प्रकार चालविला होता, तशाच गोष्टी ह्या राज्यांत लबाडांकडून घडून आलेल्या आहेत. साधारण अकलेच्या मनुष्यांनीं जो बंदोबस्त केला असता तो न करून इंदूरच्या सर्व महाजन लोकांस इंदूर सोडण्याची पाळी मागें स्वतःच्या कारभारांत **कीर्तने** यांनीं गाई. आणि कसाईच्या प्रकरणांत आणली होती. यावेळेस **शिवाजीराव होळकर** यांनींच योग्य निकाल देऊन राज्याचा स्वतंत्र हक्क व हिंदुधर्म राखला. महाराजास कामें वाटेल तशीं समजविण्यांत आणि महाराजांच्या नांवें वाटेल तशा घडामोडी करण्यांत **शामराव नारायण** नांवाच्या नायब दिवाणाचें ज्या त्या कामांत मोठें अंग होतें आणि **तराण्याचा अमीन कापसे** यांच्या मुकद्दम्यांत तर या **शामराव नारायण** इत्यादि प्रभृतींच्या कृतीचें खरें स्वरूप बाहेर पडलें. **दाजीबा कापसे** यास अंमलदारांनीं निर्दोषी म्हणून सोडून दिला होता आणि त्या पक्षाला मोठा बॅरिस्टर होता तथापि शेवटीं **कापशानीं फणशांच्या** वाड्यांतून भूमिगत द्रव्य खोदून स्वतः पचविलें होतें व त्यांतून स्वतःची मुक्तता होण्यासाठीं कामदार मंडळीस लांच दिली होती हें **शामराव नारायणचा** मृत्यू झाल्याबरोबर सर्वांस माहीत झालें होतें आणि त्याच वेळेस कीर्तने वगैरे प्रभृतिंच्या तोंडावरील तजेला कमी झाला तोही प्रजाजनांस दिसून आला होता. **कापशावर** अपराधाची शाबिती महाराजांच्या समोर झाली आणि त्या **कापशानीं** तुरुंगांत शिक्षा सुद्धां भोगिली. अशीच स्थिती **रघुनाथराव घारपुरे** नांवाच्या जंगलच्या कॉन्सरवेटरची होती. त्याच्या हरामखोरीवर कामदारांच्या यत्नानें पांघरूण घातलें गेलें होतें परंतु शेवटीं त्याचा अपराध सिद्ध झाला. महाराजांच्या निंदक वर्गांतून सुध्दां कोण मायेचा पूत या मुकद्दम्यांत महाराजांनीं अन्याय केला आणि कामदार लोकांनीं न्याय केला होता ह्मणून ह्मणण्यास पुढें येत आहे? **श्रीमंत तुकोजीराव**

महाराजांस, बळवंतराव शिंत्रे, रावजी गोरे, गोविंदराव पांडुरंग, नथो विश्वनाथ, दाजी मल्हार काळे वगैरे लोकांनीं खाली संबंधांत खूब फसविलें आहे आणि स्वतःची धन करून घेतली आहे. इतकेंच नव्हे तर शिवाजीमहाराज स्वतःच्या वडिलांच्या वेळेस कारभार पहात असतां त्यांना सुद्धां या मंडळीपैकीं कांहींकांनीं स्वतःचीं कामें करून घेण्यासाठीं नजराणा घेण्याच्या लालचींत पाडूं पाहिलें होतें. तुकोजीरावाच्या राज्यांत या लोकांनीं निवाण तगाई, बैल तगाई, सरकारी दुकानचें कर्ज ह्मणून लक्षावधी रुपयांचा फराळ केला आहे, तुकोजीराव महाराजांस कागदपत्रीं उत्पन्न वाढलें, फायदा झाला वगैरे हिताच्या गोष्टी दाखविल्या आहेत, परंतु त्यांचा परिणाम आज दिसून येत आहे. निवाणतगाई वगैरेची माहिती निराळी देण्यांत येईल. तुकोजीरावांस लालचींत टाकून विक्षिप्तकारांचे तात्या केळकर वगैरे मोठ्या सावकारांनीं हजारों रुपये लुटले त्याच योग्यतेचे तारे, भानू, वगैरे लोक जे ह्या कामदार मंडळीचे आप्त व स्नेही होते त्यांनीं मोठमोठीं गांवें इजाऱ्यानें करून घेतलीं आणि कराराप्रमाणें सरकारी रुपाया न देतां नुकसान झालें अशीं कारणें दाखवून लबाड कामदारांच्या साह्यानें पैसे बाकी ठेवीत गेले. बाकी राहिलेला रुपाया न देण्यासाठीं यापैकीं कांहीं लोकांनीं तर देव्हाऱ्यांतील कुळस्वामी अथवा ज्या नांवाचीं माणसेंच नाहींत अशांच्या नांवें गांवच्या कबुलायती व करारनामे लिहून दिले होते; व बळवंतराव शिंत्रे वगैरे लोकांनीं अशारितीनें सरकारास खरे प्रकार कळू दिले नाहींत. ही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, पांच नकट्या माणसांत एक नाकवाल्यास नकटें ठरावें लागतें. तशांतून हल्लींच्या पद्धतीला कोठली गोष्ट खरी खोटी ठरविण्यास लागणारा पुरावा साक्षीदार व वस्तुस्थितींत बदल केल्यानें मनाजोगा तयारही करतां येतो.

शिवाजीराव महाराजांस कामदार लोकांनीं ज्या गोष्टी महत्वाच्या त्या कळूं दिल्या नाहींत, कळविल्या नाहींत आणि जशा होत्या तशा पुढें येऊं दिल्या नाहींत यायोगें जर कदाचित् कोणाला

एखादे वेळेस खुद्द **शिवाजीराव महाराजा**कडून नुकसान पोहोंचलें असेल तर ती गोष्ट निराळी; परंतु तसा प्रकार झाला असल्यास त्यांत **शिवाजीराव महाराजांनीं** त्या मनुष्यास द्रव्यलोभानें किंवा द्वेषानें वाईट केलें आहे असें कदापि निष्पन्न होणार नाहीं. महाराजांनीं थोरल्या महाराजांच्या हयातींत स्वतःच्या कारभारांत कामदार लोकांची स्थिती पाहिली होती आणि त्यांना वडिलांच्यावेळेस जशा प्रकारें हे भोंदू गारुडी मातीचे रुपये करून दाखवित होते तसा प्रकार ह्या लोकांकडून आपल्या राज्यांत न होईल तर बरें असें वाटणें साहजिक व स्वभाविक होतें. **शिवाजीराव महाराज** पूर्ण वयांत येऊन बापाच्याच वेळेस राज्याचा कारभार करून गादीवर बसल्यानें यांच्या व हल्लीं हिंदुस्थानांत जीं दहा पांच मोठीं राज्यें आहेत तेथील राजे यांच्यांत फार अंतर आहे. महाराज हे स्वतःसिद्ध राजे आहेत; ते (**बॉर्नकिंग्**) जन्मतः राजे आहेत. (**मेडकिंग**) बनविलेले राजे नाहींत. ह्मणजे बापाच्या मृत्युनंतर पोरक्या पोराप्रमाणें इतरांच्या सांगीवांगीवरून अमुक गोष्टी अशाच आहेत असें समजणाऱ्या राजापैकीं नाहींत; तर त्यांना राज्यकारभारांतल्या गोष्टी थोरल्या महाराजांच्या वेळेपासून पूर्णपणें अवगत झाल्या आहेत; आणि ते स्वतः चांगल्या वयांत राज्यासनावर बसले आहेत ह्यासाठीं त्यांच्या अधिकारांत, अनुभवांत व राजेपणाचे जोरांत स्वतःसिद्धतेचा अभिमान स्वाभावीक भरलेला आहे. ह्याच गोष्टी स्वतंत्र राजे लोकांत असतात. राज्यासनावर बसल्यानंतर असे राजे इतरांच्या ओंजळीनें पाणी पीत नाहींत. आणि जे अंमलदार **शिवाजीराव महाराजांनीं** गादीवर बसल्यावर दूर केले त्यांची इच्छा महाराजांस स्वतःच्या मुठींत ठेवण्याची असल्यानें त्यांचे संयुक्त प्रयत्न चालले होते, त्यामुळें महाराजास ती जूट तोडण्यास, एकेकास त्याच्या कृतीच्या प्रमाणानें मुत्सद्दीपणाखालीं ज्या गोष्टी कराव्या लागतात त्याप्रमाणें दूर करावें लागलें. त्या दूर केलेल्या मंडळीच्या अंमलांत म्हणजे श्रीः कै. **तुकोजीराव** महाराजांच्या वेळेस **बळवंतराव शिंत्रे** वगैरेच्या ऐन अधिकाराचे जोरांत फडणिशी दप्तरांतील कागद खोटे तयार झाले होते आणि त्या घोटाळ्यांत

**मल्हारपंत नायब फडणीस** वगैरेस शिक्षा झाल्या होत्या; या गोष्टीस **नानाजी सितारामाचें** बंड हें नांव देऊन त्याची सविस्तर माहिती निराळी दिली आहे. अशा मोठमोठ्या कामदारांनीं **नानाजी सिताराम** सारख्या यःकश्चित मनुष्याचे येथें जमाम ठेविला होता, व तेथें जमणाऱ्या पैकींच लोकांत अशा उलाढाली झाल्या, अशा रीतीची लोकांची लबाडी **शिवाजीराव महाराजांनीं** राज्यगादीवर बसण्यापूर्वी अनुभवली आहे, तशांतून या कृष्णकारस्थानी मंडळीस **शिवाजीराव महाराजांचा** खरा स्वभाव व निस्पृहता त्यांच्या वडिलांचे वेळेस त्यांनीं केलेल्या कारभारांत माहीत झाल्यानें त्यांना **शिवाजीरावांच्या** राज्यांत आपणास ही हतोटी साधणार नाहीं अशी पूर्वींच काळजी पडली आणि यामुळें कांहीं राजद्रोही कामदारांनीं यांना गादी मिळण्यापूर्वींपासूनच यांच्याविरुद्ध खटपटी चालविल्या होत्या अशा लोकांची माहिती असून त्यांना कोठला स्वतःसिद्ध राजा आपल्या कारकीर्दींत राहूं देईल? अगोदर चाक फिरतें नंतर गाडा चालतो. राज्यशकट चालण्यास राजाला त्याचीं चाकें पाहिलीं पाहिजेत. तींत किती आरे खिळखिळीत झाले आहेत, किंवा किती कुजले आहेत किंवा किती वरून चांगले दिसून आंतून वाईट आहेत ते काढून टाकले नाहींत तर सर्व गाड्याची नुकसानी होणार. स्वतंत्र राजे गादीवर आले म्हणजे त्यांना आपल्या मनाप्रमाणें व्यवस्था करण्यास जुन्या पद्धतींत फरक करावा लागतो; आणि रशिया, फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्राकडेस अथवा आपल्या जुन्या इतिहासाकडेस दृष्टी दिली ह्मणजे ही गोष्ट खरी ठरते. कालमानाच्या बरोबर मनुष्याची स्थिती आपसूक बदलते. जुन्या मंडळीस स्वतःचें वर्चस्व **शिवाजीरावा**-सारख्या स्वतःसिद्ध महाराजावर राहणार नाहीं असें प्रथम वाटलें होतें त्यासाठीं त्यांनीं एकमतें महाराजांस स्वतःच्या सांगण्याप्रमाणें वागविण्याचे यत्न चालविले आणि महाराजांस त्यांचें अंतस्थ स्वरूप कळल्यावरून त्यांचा संबंध तोडण्याचें इष्ट वाटलें, त्यांत महाराजाकडेस काय दोष येतो? महाराजांच्या खऱ्या स्वभावामुळें त्यांनी त्या लोकांस, जरी त्यांचें वर्तन दोषास्पद होतें आणि त्यांना राज्याचा हिशेब देणें भाग होतें

तरीपण स्वतःच्या औदार्यामुळें साफ रीतीनें इंदूर सोडण्यास सांगितलें; यांत वास्तविक त्यांचा ह्या राजद्रोही लोकांवर किती उपकार ह्मणावयाचा. जर त्यावेळेस महाराजांनीं यांच्या कारभाराची झडती घेतली असती तर **फौजेंतील घोड्यांची खरेदी, मिस्त्रीखाना, ड्रेस, ऑफिसरांचीं प्रमोशनें, नेमणुका, इंजिनियरिंगखातें, जवाहीरखाना, खासगीखजिना, व्यापारखातीं** वगैरे खात्यांची झडती घेतली असती तर जे लोक आज विक्षिप्तकाराच्या मतानें मोठे, राजकार्यधुरंधर व इमानी दिसतात ते न जाणों कोठल्या देशोधडीस लागले असते. **शिवाजी महाराजांनीं** त्या प्रत्येकांस तसेंच सोडले, ह्यांत त्यांचें औदार्य दिसलें. तथापि "पयः पानं भुजंगानां केवलं विष वर्धनं" या उक्तिप्रमाणें त्या सर्वांस मोकळे सोडलें हें बरोबर केलें नाहीं असें ह्मणण्यास आम्हांला त्या दुष्ट लोकांनींच प्रसंग आणून दिला. महाराजांच्या मनांतून सूड उगवावयाची गोष्टच राहूं द्या परंतु या लोकांना न्यायानें शिक्षा करावयाची आली असती तर ज्या गोष्टी या लोकांच्या विरुद्ध आज इतक्या मुदतीनंतर आम्हांला सांगता येतात त्या त्याच वेळेला किती भयंकर रीतीनें यांच्या विरुद्ध जात्या. महाराजांस जर द्रव्यलोभ असता तर या लोकांच्या इस्टेटी घेऊन यांना घालवून दिलें असतें तर हे लोक अपराधी असल्यानें त्यांच्यानें महाराजांचें काय झालें असतें? कारण चोरास शासन केल्यावर त्याचे श्राप तर लागत नाहींतच, परंतु त्यांना शिक्षा केली म्हणून कोणी ठपकाही देत नाहींत. ज्या **तुकोजीराव** महाराजांनीं ह्या लोकांस माणसें करून सोडिलीं, व पुत्राप्रमाणें त्यांचें पालन केलें त्यांच्याशीं बेइमान होण्यांत ह्या लोकांनीं कमी केलें नाहीं आणि **शिवाजीराव महाराजांच्या** समोर त्यांचें बेइमान सिद्ध झालें होतें आणि आजसुद्धां त्यांच्या बेइमानीपणाचीं उदाहरणें खोटीं होऊं शकत नाहींत तर **शिवाजीराव महाराजांना** त्या कामदार लोकांविषयीं बेभरंवसा उत्पन्न झाला यांत मोठें आश्चर्य काय आहे? स्वाभाविक मनोधर्म बदलतात, त्याला क्षुल्लक कारणें असतात, हीं तर मोठीं जबर जाज्वल्य कारणें घडलीं आहेत, ह्या लोकांस दूर केलें तथापि त्याचे काडीइतकें नुकसान

**शिवाजीराव महाराजांनीं** केलें नाहीं, त्यांच्या स्थावर जंगम मिळकतीवर नजर सुद्धां दिली नाहीं उलट त्यापैकीं ज्यांनीं इतर कोठें नोकरी पत्करली नाहीं त्यांना त्यांचा पगार पोचवून चुकले आहेत, इतकेंच नव्हे तर थोर मनुष्य अशा कृतघ्न मनुष्यांची दुष्कृती मनांत ठेवीत नाहींत; त्याप्रमाणें **शिवाजीरावांनीं** या लोकांस वेळोवेळीं पैसे, जमीनी वगैरे देणग्या देऊन त्यांच्यावर उपकार केले आहेत.

अपमान सहन न होणें हें राजपुरुषाचें मुख्य तेज होय आणि **शिवाजीराव महाराज** या तेजाचा पुतळा आहे अशाविषयीं सर्वांची खात्री निदान जुबिलीच्या वेळच्या त्यांच्या इंग्लंडच्या प्रवासावरून झाली आहे अशा तेजविभूषीत राजपुरुषाचा अपमान व्हावा व त्याला त्रास होत रहावा ह्मणजे ते आपणांस बोलावतील असा समज धरून त्या दुष्ट लोकांनीं **शिवाजीरावांच्या** स्वास्थ्यास धक्का पोंचविण्यास प्रथम गृहक्लेशाची सुरुवात केली आणि **खासगीचा** बहाणा पुढें करून महाराजांच्या सापत्न मातोश्रींना चिथविल्या; आणि त्यांच्याकडून गृहच्छिद्रें समजण्यास व क्लेश वाढविण्यास सतत प्रयत्न चालविले, आणि याच लोकांनीं महाराज आणि त्यांचे बंधू यांच्यांत वैमनस्य उत्पन्न केलें इतकेंच नव्हेतर त्यांनीं **श्री कै. तुकोजीराव** व **श्री. शिवाजीराव** महाराज या पिता पुत्रामध्यें वांकडें आणिलें होतें आणि स्वतःचें घोडें जोरांत राहवें असे बेत रचले होते. अशा या क्लेश लावून देणाऱ्या निमकहरामासाठीं यमास नवीन नर्क उत्पन्न करावे लागतील यांत संशय नाहीं.

खासगीच्या प्रकरणांत महाराजांच्या सापत्न मातोश्रीस फसवून त्यांच्याकडून कित्येक लुच्चांनीं आपापलीं घरें भरून घेतलीं आणि जायदेंकरामध्यें वांकडें आणिलें आणि त्या राजबायांस पुत्रापासून निराळ्या केल्या. **शिवाजीराव महाराजांनीं** त्यांना पुष्कळ समजाविल्या परंतु जेव्हां त्या राजबाया लबाड लोकांच्या अगदीं भजनीं लागल्या त्यावेळेस मात्र गृहक्लेशांत उद्भवणारें संकट टाळण्यास **शिवाजीरावांनीं** सापत्न मातोश्रींचा नाद सोडला. तथापि त्यांची सर्व काळजी त्यांनाच घ्यावी लागत आहे आणि घ्यावी लागणार आहे. मनुष्य-

तरीपण स्वतःच्या औदार्यामुळें साफ रीतीनें इंदूर सोडण्यास सांगितलें; यांत वास्तविक त्यांचा ह्या राजद्रोही लोकांवर किती उपकार ह्मणावयाचा. जर त्यावेळेस महाराजांनीं यांच्या कारभाराची झडती घेतलीं असती तर **फौजेंतील घोड्यांची खरेदी, मिस्त्रीखाना, ड्रेस, ऑफिसरांचीं प्रमोशनें, नेमणुका, इंजिनियरिंगखातें, जवाहीरखाना, खासगीखजिना, व्यापारखातीं** वगैरे खात्यांची झडती घेतली असती तर जे लोक आज विक्षिप्तकाराच्या मतानें मोठे, राजकार्यधुरंधर व इमानी दिसतात ते न जाणों कोठल्या देशोधडीस लागले असते. **शिवाजी महाराजांनीं** त्या प्रत्येकांस तसेंच सोडले, ह्यांत त्यांचें औदार्य दिसलें. तथापि "पयः पानं भुजंगानां केवलं विष वर्धनं" या उक्तिप्रमाणें त्या सर्वांस मोकळे सोडलें हें बरोबर केलें नाहीं असें ह्मणण्यास आम्हांला त्या दुष्ट लोकांनींच प्रसंग आणून दिला. महाराजांच्या मनांतून सूड उगवावयाची गोष्टच राहूं द्या परंतु या लोकांना न्यायानें शिक्षा करावयाची आली असती तर ज्या गोष्टी या लोकांच्या विरुद्ध आज इतक्या मुदतीनंतर आम्हांला सांगता येतात त्या त्याच वेळेला किती भयंकर रीतीनें यांच्या विरुद्ध जात्या. महाराजांस जर द्रव्यलोभ असता तर या लोकांच्या इस्टेटी घेऊन यांना घालवून दिलें असतें तर हे लोक अपराधी असल्यानें त्यांच्यानें महाराजांचें काय झालें असतें? कारण चोरास शासन केल्यावर त्याचे श्राप तर लागत नाहींतच, परंतु त्यांना शिक्षा केली म्हणून कोणी ठपकाही देत नाहींत. ज्या **तुकोजीराव** महाराजांनीं ह्या लोकांस माणसें करून सोडिलीं, व पुत्राप्रमाणें त्यांचें पालन केलें त्यांच्याशीं बेइमान होण्यांत ह्या लोकांनीं कमी केलें नाहीं आणि **शिवाजीराव महाराजांच्या** समोर त्यांचें बेइमान सिद्ध झालें होतें आणि आजसुद्धां त्यांच्या बेइमानीपणाचीं उदाहरणें खोटीं होऊं शकत नाहींत तर **शिवाजीराव महाराजांना** त्या कामदार लोकांविषयीं बेभरंवसा उत्पन्न झाला यांत मोठें आश्चर्य काय आहे? स्वाभाविक मनोधर्म बदलतात, त्याला क्षुल्लक कारणें असतात, हीं तर मोठी जबर जाज्वल्य कारणें घडलीं आहेत, ह्या लोकांस दूर केलें तथापि त्यांचे काडीइतकें नुकसान

**शिवाजीराव महाराजांनीं** केलें नाहीं, त्यांच्या स्थावर जंगम मिळकतीवर नजर सुद्धां दिली नाहीं उलट त्यापैकीं ज्यांनीं इतर कोठें नोकरी पत्करली नाहीं त्यांना त्यांचा पगार पोचवून चुकले आहेत, इतकेंच नव्हे तर थोर मनुष्य अशा कृतघ्न मनुष्यांची दुष्कृती मनांत ठेवीत नाहींत; त्याप्रमाणें **शिवाजीरावांनीं** या लोकांस वेळोवेळीं पैसे, जमीनी वगैरे देणग्या देऊन त्यांच्यावर उपकार केले आहेत.

अपमान सहन न होणें हें राजपुरुषाचें मुख्य तेज होय आणि **शिवाजीराव महाराज** या तेजाचा पुतळा आहे अशाविषयीं सर्वांची खात्री निदान जुबिलीच्या वेळच्या त्यांच्या इंग्लंडच्या प्रवासावरून झाली आहे अशा तेजविभूषीत राजपुरुषाचा अपमान व्हावा व त्याला त्रास होत रहावा ह्मणजे ते आपणांस बोलावतील असा समज धरून त्या दुष्ट लोकांनीं **शिवाजीरावांच्या** स्वास्थ्यास धक्का पोंचविण्यांस प्रथम गृहक्लेशाची सुरुवात केली आणि **खासगीचा** बहाणा पुढें करून महाराजांच्या सापत्न मातोश्रीना चिथविल्या; आणि त्यांच्याकडून गृहच्छिद्रें समजण्यास व क्लेश वाढविण्यास सतत प्रयत्न चालविले, आणि याच लोकांनीं महाराज आणि त्यांचे बंधू यांच्यांत वैमनस्य उत्पन्न केलें इतकेंच नव्हेतर त्यांनीं **श्री कै. तुकोजीराव** व **श्री. शिवाजीराव** महाराज या पिता पुत्रामध्यें वांकडें आणिलें होतें आणि स्वतःचें घोडें जोरांत राहवें असे बेत रचले होते. अशा या क्लेश लावून देणाऱ्या निमकहरामासाठीं यमास नवीन नर्क उत्पन्न करावे लागतील यांत संशय नाहीं.

खासगीच्या प्रकरणांत महाराजांच्या सापत्न मातोश्रीस फसवून त्यांच्याकडून कित्येक लुच्चांनीं आपापलीं घरें भरून घेतलीं आणि मायलेंकरामध्यें वांकडें आणिलें आणि त्या राजबायांस पुत्रापासून निराळ्या केल्या. **शिवाजीराव महाराजांनीं** त्यांना पुष्कळ समजाविल्या परंतु जेव्हां त्या राजबाया लबाड लोकांच्या अगदीं भजनीं लागल्या त्यावेळेस मात्र गृहक्लेशांत उद्भवणारें संकट टाळण्यास **शिवाजीरावां**नीं सापत्न मातोश्रीचा नाद सोडला. तथापि त्यांची सर्व काळजी त्यांनाच घ्यावी लागत आहे आणि घ्यावी लागणार आहे. मनुष्य-

स्वभावाला संताप आहे आणि जेव्हां त्या बायाकडून अशीं कारणें घडलीं तेव्हां **शिवाजी महाराजांनीं** तरी काय करावयाचें आहे! द्रव्याच्या लालचीनें जे लोक राजघराण्यांत लावालावी करतात त्यांचा शेवट फारच शोचनीय होतो हें इंदूरच्या निमकहरामी व राज्यविरुद्ध खटपटी करणाऱ्या मनुष्यांनीं लक्षांत ठेवावें. असो. इकडे **शिवाजीराव** महाराजांचें राजतेज वृद्धी पावत चाललें आणि तिकडे ह्या जुन्या लोकांचें जाळें तुटलें यामुळें दोन दिशा झाल्या. श्री. कै. **तुकोजीराव** महाराजांच्या वेळेस त्यांच्या अखेरच्या कारकीर्दींत कारभाऱ्याखेरीज त्या राज्यांत बाहेरचे कोणी लोक नव्हते ह्मणून तें राज्य **शिवाजीराव** महाराजांच्या राज्यापेक्षां प्रजेस विशेष सोयस्कर होतें अथवा त्यांच्या वेळेस असणारें प्रजेचे हक्क आतां कमी झाले असें मुळींच नाहीं.

**तुकोजीरावांस** फसविणारे व **शिवाजीरावांच्या** विरुद्ध ओरडणारे लोकांस त्यांच्या वेळची बरी वाईट स्थिती चांगली माहीत होती तथापि त्यांनीं त्या राज्याविषयीं कांहीं वाईट उद्गार काढले नाहींत कारण त्या लोकांस त्यावेळीं लुटण्यास खूब फावत होतें.

व्यापारांत नफा होतो ह्मणून **तुकोजीराव** महाराजांस या लबाड लोकांनीं असें दाखवून त्यांना व्यापारी बनविलें आणि व्यापारखातें काढून सरकारी दुकानें स्थापून स्वतःचा वाटेल तसा अन्यायानें फायदा करून घेतला ही साद्यंत हकीकत दुसऱ्या भागांत येणार आहे. त्यावेळेस जर विक्षिप्तकारांच्या **बळवंतराव शित्रेसारख्या** सावकारांस लज्जा असेल तर विष खाऊन मरावेंच लागणार आहे अशा त्यांच्या चोऱ्या व निमकहरामीच्या गोष्टी प्रसिद्ध होणार आहेत. लोकांकडून चांगला ह्मणवून घेण्यास समाजाचे अग्रेसर असतात त्यांना खुष ठेवलें ह्मणजे संपलें परंतु समाजाचे पुरस्कर्ते स्वतःच्या कर्तव्यकर्मांत दक्ष असले ह्मणजे बहुसमुदायाची काळजी वाहवी लागते परंतु ज्या लोकांना बाहेर चार चौघे ओळखतात आणि ज्यांची दाद इंग्रज अधिकाऱ्यापावेतों लागूं शकते आणि ज्यांच्या तोंडून स्वतः विषयीं बरे वाईट उद्गार बाहेर जाऊं शकतात अशा सावकारांची व

त्यांच्या मिळाफी कामदारांची शैली श्री. कै. **तुकोजीराव महाराजां**च्या वेळेस चांगली भरत होती त्यायोगें त्यांच्या कारकीर्दीविषयीं चळवळ करण्यास कोणी तयार नव्हतें. त्यांतून **तुकोजीराव** मुत्सद्दी राजे होते व त्यांच्यावेळेस **बडोद्यांत खंडेराव गायकवाड, ग्वाल्हेरीस जयाजीराव शिंदे, रामपुरास कल्बेअलीखां नबाब, जयपुरास रामसिंग, हैद्राबादेस सालरजंग**सारखा खंबीर दिवाण, व जिकडे तिकडे स्वतःसिद्ध, इंग्रजांस ज्यांचें साह्य झालेलें; व एक छत्राखालीं चालत असलेल्या राज्याचे उपभोग घेणारे राजे बहाद्दर, समशेर बहाद्दर, राज राजेश्वर. व वीर बहाद्दर आपापल्या राज्याभिमनांत परस्परांशीं स्नेह संपादून चमकत होते त्या वेळेस इंग्रजांना संस्थानिकांची काळजी वाहण्याचा कालही नव्हता. त्या कालाचा विचार केला आणि अलिकडील नांवाजत असलेल्या राज्यांच्या सडका बांधण्याच्या, बगीचे सुधारण्याच्या, प्रवासांत राहण्याच्या व देखादेखी सुधारणा करण्याच्या कालमानाकडे बघितले ह्मणजे आमचे राजे स्वतःची योग्यता इंग्रजी राज्यांतील कलेक्टराएवढी सुध्दां स्वपणा राखण्यांत समजत नाहींत हें दिसून येतें, ईश्वरेच्छा !! **तुकोजीराव** महाराजांच्या वेळेस खजिन्यांत पैसा भरला गेला हें जितकें खरें आहे तितकेंच त्यांच्या वेळेपासूनच कामदार, सावकार व जमीदारानीं रयतेस जर्जर करून सोडलें हें खरें आहे. शेतकरी वर्गाची स्थिति ह्या कामगार इजारदारांनीं इतकी वाईट करून ठेविली कीं त्यांना शेंतांतून धान्य घरीं आलें कीं खाण्यास व जमिनींत पेरण्यास बीं सुध्दां सावकाराकडून आणावें लागतें. जर **शिवाजीराव** महाराजांनीं पावती सिस्टम खातें स्थापिलें नसतें तर या लोकांस फारच वाईट स्थिती प्राप्त झाली असती ! **तुकोजीरावां**च्या वेळेस जे सावकार नांवाजले गेले त्याखेरीज त्या त्या व्यापारांत दुसरा कोणी सावकार जमूं शकला नाहीं. कारण मोठमोठ्या व्यापाऱ्यांनीं कामदार लोकांस व्यापारांत सामील करून घेतले होते. त्यांच्या वेळेस आणि **शिवाजीरावांनीं** हे घोटाळे बंद केले तोंपावेतों कारभाऱ्याखेरीज वाटेल तो कामदार घ्या. त्यानें गांवे इजारे

केले आहेत त्याचा सट्टा सुरू होता त्याचीं दुकानें होतीच आणि त्या लोकांनीं जे करारनामे सरकारांत लिहून दिले त्याप्रमाणें पुरा रुपाया सरकारांत देत नव्हते कारण देणारे आणि घेणारे तेच लोक होते. बाकी राहील तिचा हिशेब पुढच्या वर्षी इतकें व्याज येईल ह्मणून रक्कम फुगवून **तुकोजीराव** महाराजांस कागद दाखवावयाचा व ज्यांच्याकडे बाकी राहील ती येण्यास त्याची अमुक अमुक इस्टेट आहे अशा खोट्या साक्षी सरकारासमोर गुजरावयाच्या. गांवें इजारा करून या लोकांनीं गांवच्या लोकांकडेस एक पै सुद्धां बाकी ठेविली नव्हती. असें असूनही सरकारांत वसूल दिला नाहीं असे लोक विक्षिप्तकारांच्या मत्तें मोठे इनामदार आहेत. व्यापारी व असे कामदार ह्यांची संगनमतें सुरू झालीं व तीं जोरांत आलीं.

राजद्रोही मनुष्याचा संबंध कोठपावेतों पाहिला पाहिजे हें पाहण्यास जुन्या इतिहासाची माहिती लागते. कारण एका व्यक्तीच्या हितांत त्याच्या कुटुंबाचा व मित्रवर्गाचा संबंध असतो. इजाऱ्याप्रमाणेंच सरकारी दुकानाची गोष्ट होते. सरकारी दुकानांतून जरी फायदा झाला असेल तरीपण राजानें व्यापारी बनून रयतेंत त्राण न ठेवणें हें कांहीं चांगलें नाहीं. सरकारी दुकानांतून लोकांनीं निरनिराळे नांवानें पैसे चावले आहेत इतकी लबाडी करून कीं, कांहीं खात्यांवरून तें खातें कोणाचें आहे याचा पत्ता अझूनही लागत नाहीं. अशा प्रकारें पैशाचे झरे **शिवाजीराव महाराजांचे** वेळेस बंद झाले तेव्हां या राज्याच्या बंदोबस्तांतून पैसे खाणें कठीण जाईल व ज्या अर्थी ह्या राजास आपलीं सर्व कृत्यें माहीत आहेत त्यांअर्थी त्यांच्यावर आपली छाप बसणार नाहीं अशा विचारांत पडून या दुष्ट लोकांनीं त्यांचे पसरलेलें लबाडीचें जाळें जरी तुटलें तरी पण त्याचा अंतर्यामीचा संबंध तुटूं नये ह्मणून त्यांनीं संकल्प केला. आणि हे लोक चोंहोकडेस गेले व **शिवाजीराव महाराजांविरुद्ध** खटपटी करूं लागले. या वेळेपासून महाराजांचें स्वास्थ्य भंगतेस सुरुवात झाली, हीं कारणें आज आमचे नजरेनें दिसतात यापेक्षां आणखी किती तरी कारणें महाराजांचे त्रासाला घडलीं असतील कीं,

त्याची कल्पना **शिवाजी** महाराज आणि या निमकहराम लोकांखेरीज इतरास करिता यावयाची नाहीं. जे लोक इंदूरांतून बाहेर गेले त्यांना आपापलें घरदार सुटल्याबद्दल कांहीं वाईट वाटलें नाहीं परंतु स्वतःच्या हातांतून एक राज्य जात आहे या काळजींत ते पडले. त्यांचीं घरें दारें सरकारांनीं घेतलीं नव्हतीच, परंतु **सर काशीराव दादा, जनरल सखाराम मार्तंड, रामजी वकील** वगैरे येथून गेलेल्या लोकांच्या आप्तगणांस सरकारांनीं बढत्या दिल्या अशा थोरपणाच्या **शिवाजीरा**-वांच्या गोष्टी पाहण्यांत नसल्या तरी विक्षिप्तकाराच्या ऐकण्यांत असल्याच पाहिजेत. **रामजी** वकीलाच्या जांवई **सखाराम आबाजी** यास महाराजानीं **नेमावर**च्या सेशन जज्याच्या जागेपावेतों चढविलें होतें. **रामजी वकीलाचे** भावास जज्जापावेतों चढविलें व त्यांस जमीनीही इनाम दिल्या. जनरल **सखाराम मार्तंड**च्या आप्तांपैकीं **विनायकराव बाळू भैया** वगैरे लोकांस मोठमोठ्या हुद्यावर नेमलेले आहेत आणि ज्या वेळेस **शिवाजी** महाराजास द्वेषी व मत्सरी ह्मणून विक्षिप्तकारानीं ठरविण्यास प्रयत्न केला त्यावेळीं त्यांना ह्या गोष्टी कशा कळल्या नाहींत.

एक पक्ष बदलला ह्मणजे त्याचे लोकही बदलतात. ही गोष्ट इंग्लंडच्या राज्यकारभारांत आज दिसून येते. वाटेल त्या राज्याचा इतिहास आज पहा; पुढें होणारा राजा आपल्याच खात्रीचीं माणसें नेमितो, आणि असें केल्यावांचून त्यांचे चालावयाचें नाहीं. गव्हरनरासही स्वतःचा स्टाफ त्याचे पसंतीनेंच ठेविता येतो. राज्याची जबाबदारी एका व्यक्तिचे शिरीं असल्यानें त्याला त्यांत वाटेल तो बदल करण्यास स्वातंत्र्य आहे. **शिवाजीराव** महाराजांनीं गादीवर बसल्यावर **काळीखास्यांत, फडणी**-शींत वगैरे ठिकाणीं निरनिराळे जातीचे व देशाचे लोक ठेविले यायोगें ज्या लोकांस इंदुरांतून जाण्याचा प्रसंग आला त्यांचा व त्यांच्या व्यवसा-यींचा असा एक पक्ष आणि नवीन आलेले लोक ह्यांचा दुसरा पक्ष असे दोन फाटे झाले. आणि ह्यांनीं परस्परांचा कमीपणा दाखविण्यास कमरा बांधिल्या. जुन्या पक्षांनीं नव्या पक्षावर किटाळें उभारलीं यायोगें महा-राजासमोर जुन्या कामाचा घोटाळा व जुन्या लोकांच्या लबाड्या विशेष

येत चालल्या. अर्थात जुन्यांतले लोक नव्यांत आणि नव्यांतले जुन्यांत असें मिळून एक तृतीय पक्ष तयार झाला. या स्पर्धास्पर्धीमुळें खऱ्या गोष्टी महाराजापुढें अतिशय पेंचाच्या बनून येऊं लागल्या.

एकंदरींत **तुकोजीराव** महाराजांच्या कारकिर्दींतील कामदारांची व सावकारांची लबाडी, पुढें **शिवाजीराव महाराजांच्या** विरुद्ध त्यांच्या **खटपटी, गृहक्लेश, नव्या जुन्याची भेसळ, पक्षाभिमान, खऱ्या खोट्या गोष्टींचा गुताडा, राज्याचें झालेलें व होत असलेलें नुकसान, महाराजांचा स्वतःसिद्ध राजपदाचा अभिमान** व त्यांची **सत्य प्रीति** या गोष्टीनें **शिवाजीरावांच्या** मनांत संशय उद्भवला. आणि त्यांनीं स्वतः-ची विश्वासाचीं ह्मणून जीं माणसें जवळ ठेविलीं त्यांत सुद्धां कांहीं असे निमकहरामी निघाले कीं, त्यांनीं महाराजांनीं काढून दिलेल्या वाईट लोकांशीं राजकीय खटपटी चालविल्या. असा प्रकार **शिवाजीरावांच्या** लक्षांत आल्यावर त्यांना कोठला मनुष्य खरा राहील याविषयीं नक्की करतां येईना. मनुष्याची अशी स्थिती होणें अगदीं स्वाभाविक आहे परंतु एकंदर घडलेल्या कारणांचा विचार केला ह्मणजे **शिवाजीरावांच्या** स्वभावांत झालेला बदल अगदींच कांहीं नाहीं ह्मटला तरी चालेल. **शिवाजीराव** स्वतः एकटे प्रजेविषयीं काळजी घेणारे, आणि त्यांच्या विरुद्ध आपापल्या मतलबासाठीं खटपटी करणारे अनेक लोक, असें झालें तरीपण नुसत्या संशयावरून त्यांनीं कोणाचें नुकसान केलें नाहीं. जवळच्या माणसांनीं इमानी राहावें व कामदारांनीं आपापल्या जिम्मेस असलेलीं कामें चोख रीतीनें करावीं ह्मणून महाराजांनीं गोड शब्दांनींच नव्हे तर हजारों रुपयांच्या देणग्या देऊनही लोकांस ताळ्यावर आणूं पाहिलें; परंतु या लोकांनीं हत्तीचे दाखविण्याचे व खाण्याचे दांत निराळे असतात तद्वत आपली वाईट कृती चालू ठेवली. **शिवाजीरावांनीं** प्रजा सुखी व्हावी ह्मणून सुधारणा करण्यांत, दान देण्यांत, लोकांना देणग्या देण्यांत व लांच खाण्याची संवय सुटावी ह्मणून कामदार लोकांचे पगार वाढविण्यांत लक्षावधी रुपये राज्याच्या उत्पन्नाच्या मानानें विशेष खर्च केले आहेत त्याची माहिती नांवनिशीवार दुसऱ्या भागांत देण्यांत येईल. इतकें

करूनहीं राज्यकारभार सुरळीत चालविण्यास पाहिजे तशी मदत होईना तेव्हां **शिवाजीरावांना** संताप यावा यांत आश्चर्य करण्याजोगतें काय आहे? स्वतःसिद्ध राजाचें महत्व आह्मां हिंदुस्थानवासी प्रजेस लाभत नाहीं ह्मणून कीं काय, **शिवाजी**महाराजांच्या प्रजावात्सल्याचें चीज व्हावें तसें होत नाहीं.

ज्या **गोपाळराव पोषाखवाल्याचा** कैवार विक्षिप्तकारांनीं घेतला आहे त्यांच्या संबंधानें येथें थोडें लिहूं. तारे नांवाचे **तुकोजीराव** महाराजांचे वेळेस एक कामदार होते त्यांनीं सरकारचा पुष्कळ पैसा बुडविला त्या तारे पैकींच हा **गोपाळराव** होता. तथापि **शिवाजीराव** महाराजानीं त्याला इतक्या हुद्यावर चढविला होता कीं, त्याच्या हातून मात्तबरीचे हुकूम लिहिले जात असत त्यांत या **गोपाळरावानें** महाराजांचे नांवें खोटे हुकूम सुद्धां लिहिले आहेत. हा गोपाळराव आजारी पडला असतां **शिवाजीराव** महाराजांनीं त्याची जोपासना करण्यास अतिशय काळजी घेतली होती, त्याला हजारों रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या, असें असून **गोपाळराव** यानें **सखाराम** पगडबंदास वळवून दिला हा किती मोठा विश्वासघात केला! **सखाराम** पगडबंद अपराधी होता, किंवा नव्हता या गोष्टीचा विचार **गोपाळराव** यास करावयाचा नव्हता. **सखाराम** पगडबंद पळून जाण्यापूर्वी तो कोतवालींत कैद राहिला होता असें विक्षिप्तकार ह्मणतात, आणि सखाराम कैदेंत असतां पळाला हेंही तेच ह्मणतात; जर **शिवाजीराव** महाराजांचे हुकुमानें **सखाराम** कैदेंत होता तर **गोपाळराव** यास त्याला घरीं पाणी पिण्यास पाठविण्याचें काय कारण होतें? पोशाखांत पाणी येऊं शकलें नसतें काय? अथवा त्या जागीं कोणी ब्राह्मण पाणी पीत नाहीं काय? यावरून सखाराम पगडबंद यास कैदेंत ठेवण्याचा हुकूम असतां त्याला पळून जाण्यास जाणून संधी देण्यास पाणी पिण्यासाठीं घरीं पाठविलें आणि नंतर सखाराम शिपायाच्या ताब्यांतून पळून गेला ह्मणून गोपाळरावानें लंगडी सबब पुढें आणली. प्रत्यक्ष पुरावा नसला ह्मणजे स्थितीपरत्वेच्या पुराव्यावर निकाल देता येतो ही गोष्ट समजून घेतली तर विक्षिप्तकारांच्या मतें गोपाळराव

पोशाखवाल्यासारखे निरपराधी लोक किती कडक शिक्षेला योग्य आहेत हें ठरवितां येईल. ह्या गोष्टी विक्षिप्तकारांसही ठरवितां आल्या असत्या परंतु त्यांनीं अपराधी वर्गानीं बाजू पत्करली आहे ह्मणून ते पक्षाभिमानांत गुंतले आहेत; त्यांनीं स्वतःचे पत्राचे नांव **अपराध्यांचा कैवारी** ठेविलें असतें अथवा अजूनही ठेविलें तर त्यांना एकंदर जगांत जो जुलूम होतो तो सर्व कळून येईल आणि निदान कांहीं वर्षें तरी अपराधी लोक स्वतःच्या बचावासाठीं त्यांना खुप पैसे देतील.

आपण जे नोकर चाकर ठेवितों त्यांनीं आपली नोकरी बरोबर करावी ह्मणून त्याला त्याच्या ठरावीक पगाराशिवाय पोस्त, बक्षीस, मिळून कांहीं तरी देत असतों. अशा लोकांनीं टाळाटाळ करून आपलीं कामें न केलीं अथवा बिघडविलीं तर त्या लोकांविषयीं आपल्या मनांत किती राग येतो ? त्या रागांत आपल्या व त्याच्या स्थितीच्या प्रमाणानें अशा नोकराशीं आपण ज्याप्रमाणें वागतों, त्यांत हेतू धरून कोठलीही कृती नसते. आलेला राग स्वाभाविक असतो. **न्हावी, धोबी, शिंपी, रंगारी, हुजरे, कामाठी, आचारी, गाडीवाले, मोतदार** वगैरे लोकांची गणना आम्हीं खासगत नोकरांत करतों. विक्षिप्तकारांच्या साधू वृत्तीला ते स्वतःच्या बरोबरीचेच वाटतात. ह्मणून त्यांना बोलूं नये, दंड करूं नये, तर पक्षकार बनून न्याय मागण्यास कोर्टांत जावें, असें विक्षिप्तकारांचें मत दिसतें. आपली गोष्ट निराळी. राजे लोकांचें येथेंही माणसें पिढीजाद नोकर असतात आणि ते त्यांच्या खास आश्रितांत मोडले जातात. ह्या लोकांवर त्यांची पूर्ण मालकी असते. या देशांत गुलामाचा व्यापार नाहीं ह्मणून नोकरांना गुलाम म्हणूं नये; इतक्यावरच या लोकांस गुलाम ह्मणतां येत नाहीं. राजघराण्यांतील **लेकावळे, कुंवर, लवंडे, गोले** ह्या लोकांची माहिती राजस्थानांत करून घेतल्यावांचून विक्षिप्तकारानीं धोबी, न्हावी, वगैरे लोकांवर **होळकर** जुलूम करितात ह्मणून त्यांचा कैवार घेतला आहे. परंतु या लोकांचा संबंध राजे लोकांशीं विशेषतः **रजपुतस्थान** व **सेंट्रलइंडिया**च्या राज्यांत इतका निकट आहे कीं, त्यांचा अन्नवस्त्र वगैरे व्यवहारीक सर्व बोजा

त्यांच्या यजमानावर राहतो. गरीबशा रजपुत **ठाकोराला** आपल्या मुलीच्या लग्नांत जावयास लवंड्या व लवंडे अझूनही आंदण द्यावे लागतात आणि ह्या लोकांवर त्यांच्या नवीन यजमानांचा कधीं कधीं तर त्याला विके पावेतोंचा अखत्यार आहे. विक्षिप्तकारांचे राजे ह्मटले ह्मणजे मुंबईशहरांतील एखाद्या **गोलडन ग्यांगचा सावकार.** विक्षिप्त-कारांनीं अशा नोकरांस होळकरसरकारानें मारले, दंड केला, व शिव्या दिल्या अशा किती गप्पा लिहिल्या तरी त्यांत सामाजिक किंवा राजकीय महत्व मुळींच रहात नाहीं. एखाद्याला दोष द्यायला कोठें जागा नसली ह्मणजे " तूं पाणी बिघडविलें नसलेंस तर तुझ्या वडिलांपैकीं कोणीं तरी बिघडविलें, निदान तूं पाणी उष्टेंच केलेंस " अशा सबबीनें दुष्टता सौम्य-वृत्तीस ग्रासूं पाहते त्यांतलेंच विक्षिप्तकाराचें काम आहे. कांहीं लोकांस **शिवाजीरावांनीं** बेदम होईपावेतों मारले असें लिहून ज्यांना मारले ते लोक लगेच छावणींत पळून जाण्यासही शक्तिमानही झाले, आणि जे मरणोन्मुख झाले ते तात्काळ छावणींत पोलिटिकल ऑफिसरांकडेस अर्ज देण्यास पळत गेले असें विक्षिप्तानें लिहिलें आहे. यांत किती खोड-साळपणा आहे. जो मरायाला पडतो, तो पळूं लागतो. जो बेदम होतो तो धांव ठोकतो, वहावा रे विक्षिप्ता! खोटें बोलणें तुझ्याच घरून निघालें आहे वाटतें! ह्या नोकर लोकांना वागविण्याचे वेळेस विक्षिप्तकार अथवा त्यांचे बातमीदार जणूं काय हाजर होतेच! अथवा दोन्हीं पक्षांचीं गाऱ्हाणीं यांच्या कानावर आलीं आहेत! **श्रीरामाच्या** न्यायाला कमी-पणा आणण्यास मिथ्याभिमानी व वेडगळ लोक "धोब्याचे ह्मणण्यावरून रामानें सीतेला टाकली हा कोठला न्याय?" असें ह्मणतात त्यांतलाच प्रकार विक्षिप्तवर्तमानपत्राचा धोबी, न्हावी वगैरे लोकांच्या गोष्टी वाढवून अथवा रचून लिहिण्यांत आहे. पक्वान्नाचें ताट समोर असतां डुक्कर विष्टा खाण्यास तडक धांव मारतो तद्वत **शिवाजी महाराजांची** चांगलीं हजारों उदाहरणें लोकांच्या तोंडीं असतां आणि त्या चांगुलपणानें विक्षिप्तकारांचे सहाध्यायी **तारे, केळकर, भानू, शिंत्रे, सखाराम पगडबंद** वगैरे लोक **शिवाजी महाराजांनीं** त्यांना लुटलें असें विक्षिप्तकार

म्हणतात तरीपण आज तारखेला गबर बनून इतर ठिकाणीं चैन भोगीत बसले आहेत; ह्या गोष्टी सिद्धांताप्रमाणें असतां विक्षिप्तकाराची दृष्टी महाराजांचें वाईटपण शोधण्याकडेसच वळली आहे.

महाराजांचा जुलूम दाखविण्यास विक्षिप्तकारांनीं स्वतःच्या जन्माच्या पलीकडच्या गोष्टी लिहिल्या आहेत; ज्या गोष्टी खास इंदूर येथील लोकांस माहीत नाहींत. ज्यांचीं नांवें गांवें खुद्द विक्षिप्तपत्रास माहीत नाहींत व ज्या गोष्टीविषयीं कोठल्याही व्यक्तीची अथवा समाजाची कागाळी इंग्रेज सरकाराकडे गेली नाहीं अशाही गोष्टी विक्षिप्तकारांनीं रचल्या आहेत. "वाजंत्र्यांना पंडतांच्या येथें लग्न कार्यास जाऊं देत नाहींत म्हणून ते लोक बाहेर गांवीं जाऊन कार्य उरकून घेतात; गुरवांचीं घरें दुसऱ्या देशीं गेलीं. रस्त्यानें जाणाऱ्यास शिव्या देतात व मारतात, रहदारी बंद केली," ह्या गोष्टी निवळ खोट्या आहेत. कोणाचें लग्न होत असतां महाराजांनीं होऊं दिले नाहीं? कोणाचा लग्नमंडप मोडविला आणि कोणाच्या येथून वाजंत्री ओढून आणले? असें एखादें नांव तरी विक्षिप्तपत्रानें द्यावयाचें होतें. खऱ्या गोष्टी नसल्या म्हणजे "**वगैरे, इत्यादि, अशाच पुष्कळ गोष्टी, किती तरी, सांगतां येत नाहीं.**" अशा बहुवाचक शब्दांनीं वाटेल तसे लेख ल्याहावेत. हा मार्ग अडाणी लोकांचीं मनें कलूषित करण्यास चांगला आहे. जे लोक माहिती मिळविण्याची इच्छा करणारे आहेत, त्यांना विचारदृष्टच्या विक्षिप्तकाराच्याच लेखांत खोडसाळपणा दिसणार आहे. "माहेर व सासूरवासणीस आपापल्या ठिकाणीं जाण्यास पंचाईत पडते" हा लेख खरा ठरविण्यास त्यांनीं एका **बॉडी गार्डाचें** उदाहरण दिलें आहे. परंतु त्यांत वुस्तूस्थितींचा विचार करून पाहिला तर ही गोष्ट घडली असल्यास विक्षिप्तकारानीं ती किती रंगवून लिहिली आहे हें कळून येईल. "तीनशें माणसांचे गराड्यांतून त्या बॉडी गार्डानें दोघांस बकऱ्यासारखे वाड्यांत ओढून नेलें "आणि " बलात्कार केला " ह्या गोष्टी किती असंभवनिय व अशक्य आहेत. बलात्कार करण्यास जी वृत्ति जागृत होते तिला कशी वेळ व स्थिती लागते हें न्यायाधिशास चांगलें कळतें.

आपे.

तीनशें माणसांसमोर बलात्कार करण्यास ती वेळ होती असें कसें मानवेल ? जर बॉडीगार्डांच्या हातून कांहीं अपराध या कामांत घडला असेल तर तो धक्काबुक्कींपेक्षां विशेष महत्वाचा नसावा असें दिलेल्या स्थितीवरून कळूं शकतें. स्वतः विक्षिप्तकार ह्मणतात कीं, महाराजांनीं त्या बॉडीगार्डाला शिक्षा केली. त्यांत महाजांनीं कोठला अन्याय केला ? या कामांत **शिवाजीराव महाराजांनीं** फिर्यादीची बाजू घेतली आहे काणि नोकर लोकांस चांगली जरब दिली आहे; कारण अपराधाची शाबिती करण्याचे आणि आपराध्यास स्वतः बचाव करण्याचे मार्ग मोकळे न ठेवतां बॉडी गार्डास महाराजानीं शिक्षा केली यावरून रयतेचें रक्षण करण्यास आणि वाईट लोकांस शिक्षा देण्यास महाराज किती तयार आहेत हें दिसून येतें. फिर्यादी लोकांस, बॉडीगार्डावर मॅजिस्ट्रेट कोर्टांत रीतीची फिर्याद करण्यास महाराजांनीं मनाई केली नाहीं. तीनशें लोकांनीं रात्रीचे समयीं राजवाड्यावर येणें हें हंगामा करण्यासारखें काम आहे. रयतेनें राजाकडेस केव्हां व कोठल्या मार्गें दाद मागावी हें कळत नाहीं असे अज्ञानी लोक आणि मुख्यतः वाणी लोकांत इंदूर शहरांत क्वचित् सांपडतील. फिर्याद करणें झाल्यास त्याला तीनशें लोकांचा जमाव तरी कशास पाहिजे ? याच उदाहरणांत आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. विक्षिप्तानें महाराजांस असे जुलमी ठरविले आहेत कीं त्यांच्या समोर लोक जाण्याम भितात. हजेरीसाठीं हजारो लोकांचा थवा असला तरी तो भितो. मग ह्या वाण्यांनीं रात्रीच्या वेळेस राजवाड्याकडे आपला मोरचा फिरविला आणि ज्या अर्थी त्यांत फिर्याद करण्याचा ज्याचा संबंध पोचत नव्हता असेच लोक होते त्या अर्थीं तर त्यांना असा गलबा करण्यास महाराजांच्या विरुद्ध असणाऱ्या मोठ्या धेंडाची फूस असली पाहिजे. ह्या उदाहरणांत महाराज जुलमी नाहींत तर प्रजेची दाद घेतात हें चांगलें निष्पन्न होतें. महाराज एकट्या दुकट्याची दाद घेणार नाहींत ह्मणून वाणी लोक जमावानें गेले असें धरलें तर त्या लोकांचे अशा तऱ्हेनें वाड्यांत जाणें भयंकर स्वरूपाचा अपराध होतो; आणि संयुक्त

बळाचा महिमा जाणणारी प्रजा इंदूरांत आहे असें सुद्धां ठरतें. मग अर्थातच महाराजांचा जुलूम चालूच नये; आणि ते तो जुलूम सहन करणारे लोकही इंदूरांत नाहींत तर महाराज जुलूम तरी कोणावर करतात? वाणी लोकांचा मुचलका मॅजिस्ट्रेटानें घेतला तो त्यांनीं फिर्यादी करण्याचे सरळ मार्ग सोडून आयंदे असा गलबा व गर्दी करूं नये अथवा कोणाच्या चिथवणीनें वाड्यांत एकत्र मिळून गेले असें निष्पन्न झाल्यास त्यांनीं चोकशीसाठीं हाजर राहिले पाहिजे ह्मणून.

"कॉनशन्स् इझ् जज्ज" ही उक्ती मनदेवता बऱ्या वाईट गोष्टीला साक्ष देते, या अर्थाची आहे. मतलबापासून पक्षपात जडतो, आणि ज्याला कोणापासून स्वतःचा मतलब करून घ्यावयाचा नसतो त्याला कोणाची मुरवत नसते. मुरवती वांचूनचें काम रोख ठोकीचें आहे. **शिवाजीराव होळकर** यांना एखाद्याचा पक्षपात करून दुसऱ्याला त्रास देण्यांत काय मतलब आहे? कारणावांचून साधारण अकलेचा मनुष्य इतराच्या आड येत नाहीं. **शिवाजीमहाराजांना** त्यांचा ज्यांच्याशीं कधीं कांहींच संबंध नाहीं अशांना त्रास देण्याची बुद्धी कशी होते? विक्षिप्त वर्तमानपत्रकारांचा आणि बदमाष लोकांचा परंपरेनें संबंध असल्यानें त्यांचे लेख कुत्सित बुद्धीचे, आगळिकीचे आणि मत्सरांनीं भरलेले आहेत. **शिवाजी महाराजांनीं** रहदारी बंद केली आहे असें विक्षिप्तकार ह्मणतात परंतु त्यांना जर डोळे असते तर त्यांनीं दोन वाड्यांच्या मधून जाण्यास व छत्री लावण्यास कांहींएक अडचण नाहीं अशा **जाहिराती** मोठ्या अक्षरांनीं कैक वर्षांपासून महाराजांच्या हुकुमानें वाड्याजवळ लाविल्या गेल्या आहेत त्या दिसल्या असत्या. दोन्ही वाड्यांच्या मधून कोणाची गाडी चालली असतां ती अडवली गेली हें विक्षिप्तांनीं कां दिलें नाहीं? आतां असें गृहीत धरून चालूं, कीं महाराजांनीं रहदारी बंद केली तरी त्यांत त्यांनीं कोठला जुलूम केला? "ह्या रस्त्यानीं रहदारी नाहीं, येथें अमूक करूं नये, येथून गाड्या नेऊं नये" वगैरे हुकूम आपापल्या हद्दींत, अधिकारी लोक इंग्रजी शहरांत चापून देतात. जर रहदारी बंद आहे असें जाहीर केलें

गेलें तर मग लोकांनीं त्या रस्त्याला काय ह्मणून जावें ! विक्षिप्तानीं वाटेल तसे लेख लिहिले तरी पण त्यांत त्यांना **शिवाजीराव** होळकरांसाठीं **महाराज** हा शब्द वापरावा लागला आहे, त्यावरून तरी त्यांना **राजा** आणि **प्रजा** हे दोन शब्द निदान ऐकून माहीत आहेत असें आम्हीं समजतों. यासाठीं त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं प्रजाजन, राजास आपला ईश्वर मानतात आणि त्यांची इच्छा त्यांच्या आज्ञा समजतात. विक्षिप्तकारानीं **मॉनर्की** आणि **ऑली गरकी, डेमॉ-क्रसी,** ह्मणजे एक **स्वामित्व, अल्पजनप्रभुत्व** आणि **लोकप्रभुत्व** या विषयांवर माहिती मिळविल्यावांचून राजकीय विषयाचा विचार करणें अर्ध्या हळकुंडावर गांध्याचें दुकान काढणें होय. विक्षिप्तकार महाराज ! राजकीय विषयावर आणि त्यांतून स्वतःसिद्ध राजांच्या आचार विचारावर लिहिणें, रावसाहेब अथवा रावबहादुरांची वाखाणणी करण्यासारखें नाहीं. विक्षिप्तकारास स्वतःचे आचारविचार सुधारण्याचें अजूनही पुरतें ज्ञान आलें नाहीं तोंच अधू डोळ्यांनीं एखाद्यास सूर्याची तेजःपुंजता पाहण्याची प्रवृति होते, तद्वत् एक प्रभुत्वाविषयीं विचार करण्यास ते तयार होतात. गाय किती मोठी होती हें दाखविण्यास बेडूक पोट फुगविण्यांतच मेला अथवा गवऱ्या वेचणारी ह्मणते मी लक्ष्मीच्या गुण दोषाचें वर्णन करिते. अथवा **पेटमें पानीका बूंद नहीं और मेरा नाम दर्याखां** तद्वत ह्या वेड्या **भाट्यांची** अक्कल दिसते. भाटे कोठल्या मुत्सद्दी लोकांच्या मालिकेंत गोंवलें गेले होते किंवा कोठल्या विषयावर त्यांचें मत्त लोकमान्य झालें आहे ? अथवा त्यांचें घराणें तरी कोणाला चांगलें माहीत आहे ? भाटे साहेब स्वतःची शक्ति पाहून आपण विषय हातीं घेतला नाहीं याबद्दल आह्माला आपली कींव येते. लोकांना मात्र आपला धिःकार करावासा लागतो. " हा घोडा आहे असें खालीं लिहिल्यावांचून ओळखतां न येणारे घोड्याचें चित्र काढणारा चित्रकार जितका हुषार व चित्रकारांत गणना होण्याजोगा तितकीच योग्यता हे कोण भाट्ये आहेत त्यांची व त्यांच्या वर्तमान-पत्राची, राजनिष्ट लोक करून राहीले आहेत. त्यांनीं **शिवाजी** महाराजांचा

जुलूम ह्मणून तेच्या तेच बनाऊ लेख स्वतःच्या मनाचें चित्र दाखविणाऱ्या बीभत्स शद्बांनीं लिहिले आहेत तथापि शिवाजी महाराजांचा खरेपणा व औदार्य, स्वराज्याची माहिती मिळविणाऱ्या लोकांच्या डोळ्या समोरून हालत नाहीं. "महाराज हजेरी घेतात" म्हणून विक्षिप्तकारांचा आक्षेप आहे परंतु महाराज हजेरी घेतात यांत काय वाईट आहे ? ह्यावरून रयतेविषयीं महाराजांना काळजी आहे ही गोष्ट व्यक्त होते. हजेरींत "लुच्या लोकांच्या नादीं लागू नका, लागल्यास खराबी होईल" असें महाराज लोकांना सांगतात ही गोष्ट खुद्द विक्षिप्तकार ह्मणतात; यावरून तर प्रजा जनांनीं वाईट मार्गी लागूं नये ह्मणून महाराज स्वतः किती काळजी वहातात, हें सिद्ध होतें. असें असतां कावीळ झालेल्या मनुष्यास जसें सर्व पिवळे दिसतें, तसेंचं विक्षिप्तकारांनीं शिवाजी महाराजांचा वाईटपणा दाखविण्याची दृष्टी धारण केल्यानें त्यांना महाराजांच्या प्रजावात्सल्याच्या कृती सुद्धां वाईट पणाच्या दिसतात याला कोणाचा उपाय आहे ? राज्यांत शांततेचा भंग होण्याची वेळ आहे अथवा बदमाष लोकांचा जोर वाढता आहे असें कळल्यावर पाश्चिमात्य सुधारलेल्या राष्ट्रांत **जाहीरनामे, प्रसिद्ध पत्रिका, आज्ञापत्रिका** वगैरे निघून तपासाचें काम जारीनें चालतें, आणि बदमाष लोकांचा बीमोड करण्याचे प्रयत्न होतात. पार्लमेन्टाचे हातून जेथें राज्यकारभार चालतो अशा ठिकाणीं जेव्हां **लिबरल, कॉन्सर वेटिव, युनियनिस्ट,** वगैरे पक्षांची चढाओढ चालते आणि **ॲनराकिस्ट, सोशियालिस्ट, निहीलिस्ट** वगैरे राज्यद्रोही लोकांचे लपंडाव चालतात त्यामुळें राज्याच्या जबाबदारांस किती उलाढाल्या कराव्या लागतात याची माहिती वर्तमानपत्रकारांस नसणें ह्मणजे जगाची विस्तृतता त्यांनीं स्वतःची गृहाइतकीच मानणें होय. **अफगाणिस्थान**ची स्थिति आपणांस लक्ष्यांत घेतली पाहिजे. स्वतः चैन भोगण्यापेक्षां राज्याचें महत्व वाढविण्यास, स्वतःचे विरुद्ध असलेले लोकांस त्यांच्या परिवारासह हद्दपार करणें आणि कैद करणें आणि वेळ प्रसंगीं जिवें मारणें ब्रिटिश राज्याचा जानी दोस्त अमीर **अबदुररहिमान खांस** भाग

पडतें. आणि दोस्तांच्या हक्कांत् सुद्धां परोपकारी, निर्भीड, सत्यप्रसारक व महत्वाकांक्षी इंग्लिश राज्यांस अमीराचे आड येतां येत नाहीं; यांत जो मुत्सद्दीपणा भरलेला आहे तो पूर्ण रीतीनें लक्षांत घेतला पाहिजे. शिवाजी महाराजांचे विरुद्ध जे बदमाष लोक विनाकारण ओरडतात, व ज्यांनीं शिवाजीराव महाराजांच्या व्यक्तिमात्रांच्या वर्तनाच्या बऱ्या वाईटपणाविरुद्ध आह्मीं बोलतों ह्मणून बाहणा करून सर्व इंदूर राज्याच्या स्वास्थ्यास धक्का पोंचविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे त्या लोकांस त्यांच्या अशा नीच कृतीबद्दल शिवाजी महाराजांनीं मुत्सद्दीपणा खाली करावयाची शिक्षा केली नाहीं, यांत महाराजांची थोरवी दिसते. परंतु ती दया बदमाष लोकांना उत्तेजनार्थ कारणीभूत झाली. हिंदुस्थान सरकारांनीं अशा लबाड लोकांचा बंदोबस्त करून होळकर सरकार आणि स्वतः मधील स्नेह वाढविला पाहिजे. राज्यद्रोही लोकांस त्यांच्या घरादारासह घाण्यांत पिळून काढले जात होते अशी प्राचीन इतिहासांत नीतिमान राज्यांत उदाहरणें घडलीं आहेत.

सांप्रतकाळीं हिंदुस्थानवासी जनांचीं मनें अर्धवट झालीं आहेत, त्यांना तर्कटवाद करण्यापुर्ती विषयांची माहिती आहे; अशा अर्धवट लोकांस स्वतःचें ज्ञान जगांत दाखविण्याचा उतावेळपणा होत गेल्यानें त्यांच्या हातून सहज प्रमाद घडतात. शिवाजी महाराजांस जें करावें लागतें, तें कां करावें लागतें याची कल्पना तरी करण्यास ईश्वरानें विक्षिप्तास बुद्धि दिली नाहीं याबद्दल आम्हांला त्याची दया येते. "**समानशीले व्यसनेषु सख्यं**" या वाक्याप्रमाणें विक्षिप्तानीं गोपाळराव पोषागवाले, तारे, भानू, शित्रे, भाव्ये, वगैरे लोकांचा पक्ष स्वीकारिला आहे. ज्या वर्तमानपत्रकारांस राजकीय विषयावर विचार करण्याचें ज्ञान आहे, अथवा तसा विचार करण्यास जे योग्य ठरले आहेत असे लोक महाराजांच्या भलेपणाचीच कीर्ति गातात. वेळ प्रसंगीं लोकस्थिती व देशरिवाज चांगल्या रीतीनें न कळल्यानें इंदूराधिपतीविषयीं एखादी गोष्ट त्यांच्याविरुद्ध लिहिली गेली असेल तिचें परिमार्जन या पुस्तकानें होईल असें आम्हीं समजतों. विक्षिप्तकार स्वतःस स्पष्टवक्ते,

राज्यसुधारक, व निस्पृही मानतात आणि स्वतःची थोरवी स्वतःच प्रसिद्ध करतात. यावरून तर " आपुली आपण करी स्तुती तो एक मूर्ख " ही साधुवाणी विक्षिप्तकारांस अक्षरशः लागू होते. महाराजांचा जुलमी प्रकार ह्मणून विक्षिप्तकारांनीं वाणी लोकांवर झालेल्या जप्त्याचीं उदाहरणें दिलीं आहेत. महाराजांच्या इतर चिठ्या व हुकुमांचे जसे उतारे देऊन महाराजांचा जुलूम दाखविण्याचा आव ह्या वर्तमानपत्रकारांनीं घातला आहे तसा आव न घालतां सरळ बुद्धीनें महाराजांचा रुपये वसूल करण्याच्या हुकमाचा अक्षरशः उतारा त्यानें कां घेतला नाहीं ?

लोकांकडेस सरकारी रुपाया फार बाकी राहिला आणि सरकारी नोकर व ह्यांच्या मिलाफी सावकारांकडेस तो रुपाया बाकी निघतो अशी महाराजांची खात्री झाल्यानंतर मागील बाकीचा हिशेबानें देणें घेणें नक्की करण्यासाठीं हिशेबी कौंसील स्थापिलें. आणि त्यांत ह्या कामाचा निकाल करण्यासाठीं मोठ्या रकमेची मंजुरी दिली. ( हिशेबी कौंसीलची सर्व हकीकत दुसऱ्या भागांत येईल. ) तेथें जे हिशेब तयार झाले त्यावरून, लोकांचे नांवें जी बाकी निघते तींत अर्ध्यापेक्षां जास्ती रुपाया खरा निघतो अशी महाराजांची खात्री झाली तेव्हां आणि ह्या कामदार लोकांनीं कामें लांबणीवर टाकलीं असें पाहिल्यावर महाराजांनीं पहिली बाकी वसूलीचा हुकूम ज्यारी केला आणि त्याप्रमाणें काम सुरू झालें. या हुकुमाचा उतारा दुसऱ्या भागांत दिला जाईल. त्यावरून कोणाचीही खात्री होईल कीं महाराजांच्या मनांत लोकांचें द्रव्य लुबाडण्याचें आहे किंवा देणें निघाल्यास त्यांच्या मुलाबाळास सुद्धां परत देण्याचें आहे. ज्यांच्याकडे सरकारी रुपाया घेणें निघतो त्याला तो रुपाया दाखल करण्याची एक महिन्याची नोटीस देण्यांत येते आणि ह्या मुदतींत त्यानें तो रुपाया न दिल्यास त्याच्या जिंदगीचा लिलांव रितीप्रमाणें करण्यांत येतो. यांत कोठला अन्याय होत आहे ? ज्या सात वाण्यांचा पक्ष घेऊन विक्षिप्तकारांनीं त्यांची हकीकत देण्यांत स्वतःच्या पुस्तकाचीं पानें फार आहेत असें दाखविलें आहे त्याच

हकीकतीवरून विचार केला तर लोकांची खात्री होईल कीं त्या लोकांचीं घरेंदारें सरकारांनीं लुटून नेलीं नव्हतीं अथवा त्यांच्या घरांत जास्त माल असतां तो कमी दाखविण्यास खोटे कागद तयार केले नव्हते. सर्वांत मुख्य गोष्ट त्या सावकारांस अथवा रयतेस छळण्यास त्यांच्या सह्या जुलमानें करवून घेऊन हिशेब तयार करविले नव्हते. विक्षिप्तकारानीं महाराजांच्या जुलमासंबंधानें लिहितांना "महाराजांनीं लोकांस मारण्याचीं नवीन यंत्रें बनविलीं आहेत" अशीं वाक्यें दिलीं आहेत. ह्या गोष्टी जर खऱ्या असत्या तर लोकांवर अपराध शाबीत करण्यास महाराजांनीं त्यांच्याच सह्या करवून घेऊन वाटेल तसा पुरावाही बनविला असता अथवा ते वाणी लोक इंदूराच्या बाहेर सुद्धां जाऊं शकले नसते. आणि त्यांच्या मागें त्यांच्या आप्तवर्गास मो[illegible] इष्टेटी सोंपल्या नसत्या. ऋणकोनें माल लांबवूं नये म्हणून त्यांची अव्वल जप्ती करावी लागते हा न्याय आहे. जुलूमच करावयाचा आहे तर हिशेबी रीतीनें निघत असलेले रुपये पूरे वसूल न घेतां अर्धे रुपये वसूल करण्याचा हुकूम महाराजांनीं कां दिला असतां? आणि तशांतूनही ज्यांचें घेणें सरकाराकडे फाजील निघेल त्याला सरकारांतून तें परत दिलें जाईल व खोटे हिशेब करणाऱ्या अंमलदारास शिक्षा दिली जाईल असा लेखी दाखला लोकांस द्यावा असा हुकूम महाराजांनीं कां केला असतां? यावरून शिवाजीराव महाराज पैशाचे लोभी किंवा पैशासाठीं अन्याय करणारे राजे कदापी होऊं शकत नाहींत. विक्षिप्तकारांनीं लिहिलें आहे कीं, सखाराम पगडबंदाचे बापाजवळ शिवाजी महाराजांनीं पन्नास रुपये मागितले आणि सांगितलें कीं इतके रुपये दिलेस कीं, तुला सोडून देऊं. अशा लेखानें महाराज लोभी ठरतील तरी कसे? पैशाचीच महाराजास इच्छा होती तर सखाराम पगडबंदाचें सर्व घरच घेतलें असतें. आतां विक्षिप्तकाराचा लेख खरा आहे असें मानून विचारितों. सखाराम पगडबंद महाराजांचा नोकर होता व या नोकरींत त्याला महाराजांकडून पुष्कळ देणग्या मिळाल्या आहेत; त्याणें महाराजांचें पागोटें न बांधिलें आणि तें बांधण्यास महाराजांस निराळा खर्च पडला

तर त्याबद्दल तो आणि त्याचा बाप एकत्र आहेत अशा स्थितींत त्याच्या बापाजवळ रुपये कां मागूं नये ? “ स्त्रियांचे नीटनेटके व सुरेख चेहऱ्यांचें दर्शन झालें कीं त्यांना जुलमानें धरून नेऊन त्यांजवर बलात्कार करण्यांत येतो. ” अशा विक्षिप्ताच्या लिहिण्यानें तर त्यांचें स्वतःच्याच कुलशीलाविषयीं आमची चांगली खात्री होते. त्यांच्या तर्कटी स्वभावाची प्रतिमा आमचे समोर उभी राहते. **रामजी** वकीलांचे जांवई, **सखाराम आबाजी** यांनीं **बट्टेवाली** नांवाच्या वेश्येशीं संबंध ठेविला आहे असें ऐकून महाराजांनीं त्याला सुधारण्यास पुष्कळ प्रयत्न केले. “ तुला दुसरें लग्न करावयाचें असल्यास तें कर, मी पैसे देतों.” ह्मणून महाराजांनीं ज्याहाली केली; व शेंवटीं त्याला इंदूरांतून बाहेर गांवीं कामावर पाठविलें. इतरांस वाईट मार्गें न जाऊं देण्याची महाराजांची ही खटपट आहे. शिवाय त्यांच्या पवित्रपणाबद्दल चोहोंकडे खात्री आहेच, असें असतां विक्षिप्तकार किती नीच रीतीनें ते लेख लिहितो आणि तेही एक्या कुलीन महाराजाविषयीं. यावरून त्यांची गणना कशांत करावयाची हें वाचकांनींच ठरवावें.

स्वातंत्र्याचे जोरावर अनाचार करणाऱ्या लोकांचे व वेश्या समाजाचे, विक्षिप्तकार वकील दिसतात. कोठें राजकीय संबंध आणि कोठें बट्टेवाली आणि तीन्ही या वेश्यांस घालवून देण्याची गोष्ट! अशी ‘विसंगतता, विरुद्धतता, असंभवता व अवश्यकता ’ विक्षिप्तांनीं महाराजांस सुधारण्याचा आंव दाखवून, राष्ट्रांचें वाईट इच्छिण्यासाठीं स्वतःचे पत्रांत दपटलीं आहेत. एके ठिकाणीं बेदरकर, नानकचंद, व बिशेसरनाथ या त्रिवर्गास हुषार, पोक्त व अनुभवी म्हणून त्यांना राजीनामा देण्याची वेळ आली म्हणून महाराजांस दोष दिला आहे. नंतर दीड महिन्यांनीं त्याच नानकचंदास कारभाऱ्याच्या जागेस अयोग्य ठरविण्यास विक्षिप्तानें जीं कारणें दिलीं आहेत तींत ते लठ्ठ नाहींत, गोरे नाहींत, वगैरे दिलीं आहेत. एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, महाराज छावणींत गेले, आणि त्यांनीं यादवराव भैयाच्या सासूस गाडींत घेतली व शहरांत आले. नंतर ह्मणतात कीं, सासूला गाडींत घेतली असें लिहि-

लें तें चुकीचें आहे तर तिच्या मुलास बरोबर नेलें. स्त्री आणि पुरूष यांच्यामध्यें त्यांच्या बातमीदाराला फरक दिसला नाहीं काय? अशाच रीतीनें कोठें लिहून नंतर चुकीची दुरुस्ती करण्याबद्दल विक्षिप्तकारांच्या संवईसाठीं त्यांच्या तोंडावर प्रथम दहा खेटरें मारावीं आणि नंतर चुकलों ह्मणून माफी मागावी हीच रीत योग्य ठरेल. विक्षिप्तांनीं आणखी म्हटलें आहे कीं, छावणींत बाजाराच्या मागें मुराई मोहोल्यांत जाण्यास एक गल्ली आहे तींत भंग्याच्या गाडीवांचून इतर गाडी जाऊं शकत नाहीं. इतकी लहान गल्ली जर ती आहे तर तींत महाराजांची दोन घोड्यांची बगी गेली कशी व वळली कशी? खरें पहातां महाराजांच्या राजकीय गोष्टी खेरीज आम्हांस त्यांच्या इतर बाबतींचा विचार करण्याची जरूर नाहीं. असे राजकार्य धुरंधर मनुष्य कबूल करतील. विक्षिप्तानें महाराजांच्या खासगत व कुटुंबांतील गोष्टी वाटेल तशा बनावून दिल्या आहेत त्या जरी अक्षरशः खऱ्या असल्या तरी त्या प्रसिद्ध करण्यानें कोणाचें हितगुज होणार आहे? बोलून चालून त्या राजकीय महत्वाच्या नाहींत आणि कुत्सित बुद्धीच्या मनुष्याखेरीज इतर कोणी लक्षांत घेणार नाहींत अशा स्वरूपाच्या आहेत. जुन्या व नव्या कामदारांची व त्याना सामील असलेल्या सावकार व कांहीं इतर लोकांची वाईट कृती महाराजांच्या दृष्टीस पडली त्यामुळें त्यांच्या मनाला दुःख झालें. कांहीं वेळा या चोरटे लोकांच्या धाडी पाहून महाराजांना संतापही आला. अशा वेळीं संताप येणें फार स्वाभाविक आहे. इंग्रेजी राज्याची गोष्ट पहा. इसवी सन १८५७ च्या बंडानंतर, बंडवाल्याचा इनसाफ सुरू झाला त्या पूर्वीं तारतम्य चौकशी करून अथवा सुरुवातींत तर नुसत्या सांगीवांगीवर इंग्रज लोकांच्या हातून निरपराधी लोक सुद्धां मारले गेले आहेत परंतु बंडांत इंग्रजांचे मुलाबाळावर जो जुलूम बंडवाल्यानीं केला त्याकडे पाहिलें तर त्यांना ह्या गोष्टीबद्दल कांहीं दोष देतां येत नाहीं.

चोरांचा पत्ता लागत नसला ह्मणजे ज्या मंडळीशीं झालेल्या चोरीचा संबंध पोंहोचूं शकतो त्या त्या मंडळीच्या घराची झडती घ्यावी

लागते व त्या लोकांस केदेंत ठेवावें लागतें. ही गोष्ट बारीक सारीक कामांत होते तर राजकीय खटपटींत महाराजांनीं खरे चोर शोधण्यास अथवा चोरांची फूट तोडण्यास स्थितीपरत्वें करावे लागतात तेच प्रयत्न काय ह्मणून दोषास्पद मोजले जावेत ? " कुंपण तुटली नाहीं, दरवाजा उघडला नाहीं आणि बागेंत रेडा येऊन फल फुलें चोरून गेला" अशी खबर माळयानें स्वतःच्या धन्याला दिली तर त्याच्या इमानाविषयीं मालकानें किती भरंवसा ठेवावा ? शिवाजी महाराज विद्वान आहेत बहूश्रुत आहेत, त्यांचें वाचन फार आहे असे उद्गार जेव्हां जेव्हां जे कोणी त्यांना भेटले आहेत व ज्यांना त्यांच्याशीं कांहीं गूढ विषयावर बोलण्याची वेळ आली आहे त्यांना कळून चुकलें आहे. इतर या राष्ट्राचे अधिपती इंग्रज अंमलदारापुढें कशा रीतीनें गोंडा घोळत राहतात व त्यांच्याकडून वेळोवेळीं स्वतःचा किती अपमान सहन करून घेतात हें ज्यांना माहीत आहे त्यांना शिवाजीराव महाराजांनीं राजेपणाचा मान कसा सांभाळून ठेवला आहे हें माहीत असलें पाहिजे.

आमचें ह्मणून जितकें आहे तें नाहींसें होत चाललें आहे मग त्याला कांहीं कां कारण असेना ! कोणी ह्मणतात आमच्या लोकांत शक्ती नाहीं; कोणी ह्मणतात आमचे दिवस बिघडले, कोणी म्हणतात आम्हाला आमचें मारक होत चाललें आहे म्हणून जें चांगलें दिसतें तें घेतलें पाहिजे. या सर्व म्हणण्यापेक्षां आमचें आम्हीं पहात नाहीं आणि सांभाळीत नाहीं ही गोष्ट आमच्या उतार स्थितीचें सर्वमान्य कारण आहे. **गायकवाड, शिंदे, कोल्हापूरचे छत्रपती** यांच्या संस्थानाप्रमाणें इंदूर राज्यांत आजपावेतों सुधारा करण्याचें इंग्रजांना कारण पडलें नाहीं. इंदूर राज्याची काळजी वाहण्याची अथवा लोकावर उपकार करण्याची संधी त्यांना मिळाली नाहीं आणि शिवाजी महाराजांस त्यांच्या आश्रया खालीं वयांत येण्याचेंही कारण पडलें नाहीं; ह्यामुळें इंदूर राज्यांत सुधारणा झाली नाहीं अथवा महाराजांची कृती अमूक प्रकारची आहे अशी कल्पना करण्यापूर्वीं ऐतिहासिक दृष्टीनें या राष्ट्राच्या स्वराज तेजाच्या इतर सर्व गोष्टी पाहिल्या पाहिजेत. सुधारणा

होण्यास अथवा इतरांचें चांगलें दिसतें तेंच चांगलें होण्यास देश-रिवाज व लोकस्थितींचें ज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. अपराध तोच असला तरी पण निरनिराळे देशांत त्याला निराळे प्रकारचें शासन असतें. अपराधास सुधारण्यास, कोणी अपराधास करूं नये म्हणून दरारा बसविण्यास आणि अपराध होण्याचे मार्ग बंद करण्यास योग्य असें शासन पाहिजे आहे आणि ते अपराध करण्याच्या रीतीवर कमी जास्त ठरविलें पाहिजे या गोष्टी लोकस्थितीवर अवलंबून राह-तात. प्राण घेण्यास कोणी फांशी देतात, कोठें तरवारीनें मान उड-वितात आणि जीव घेणें योग्य नाहीं ह्मणून ही रीत कोठले एखादे देशांत पसंत नाहीं. **स्पार्टन** लोकांचा इतिहास पाहिला तर ज्या गोष्टी एक देशांत अपराध म्हणून मानल्या जातात त्या इतर देशांत मुळींच अपराध होत नाहीं असें ठरतें. देशरिवाजाप्रमाणें गोष्टी निंद्य किंवा वंद्य मानल्या जातात, ह्मणून लोकस्थिती व देशरिवाजाचें प्रमाण कळल्यावांचून एक गोष्ट इतराकरितां बरी किंवा वाईट ठरविणें चुकीचें आहे. नवीन गोष्ट स्थापन करण्यांत तिच्या अग्रेसरांस किती वाईटपणा घ्यावा लागतो ! प्रत्यक्ष इंग्लिश राज्याला जर त्यांचेच लोक सर्व गोष्टींत चांगलें ह्मणत नाहींत तर मग देशरिवाज व लोकस्थितीचें अज्ञानांत शिवाजी महाराजांस लबाड लोकांच्या एकतर्फी व अतिशयो-क्तिनें भरलेल्या खासगत गोष्टीमुळें वाईट ठरविणें जगांत चांगूलपणा नाहीं असें म्हणणें होय. शिवाजी महाराजांचे विरुद्ध खटपटी करणाऱ्या लोकांच्या स्थिति रीतीचा खुलासा दुसऱ्या भागांत होणार आहे. शि-वाजी महाराजांस या थोडक्या लुच्या मनुष्यांखेरीज इतर कोणीं वाईट म्हणत नाहींत.

प्रत्यक्ष इंदूर शहराची गंमत पहा. त्यांत वस्तीवांचूनचें घर सांप-डत नाहीं व घराला दिवसेंदिवस भाडें चढत चाललें आहे. शिवाजी गंज, मल्हार गंज, सराफा, कृष्णपुरा वगैरे बाजार व्यापारामुळें किती गजबजला राहतो हें विक्षिप्ताचे बातमीदारास दिसत नाहीं म्हणून या गोष्टीची सत्यता कमी व्हावयाची नाहीं.

सूतयंत्राच्या गिरणी संबंधांत ज्या सावकारावर जुलूम झाला आहे अशी विक्षिप्तकारांनीं कथा गायिली व त्यांपैकीं एका वाण्यास बॅरिस्टरच्या बरोबरीचा बनविला त्यांचीच गोष्ट पहा. पोलिटिकल एजंटच्या आश्रयानें हे सावकार इंदूर शहरांत परत आले व त्यांच्यावर शिवाजीराव महाराजांनीं पूर्वी जुलूम केला होता. मग पूर्वींपेक्षां प्रत्येक रतलास एक पै जास्त भाव कबूल करून त्यांनीं तो माल पुनः घेण्याची कबुलायत कां करावी ? बोलून चालून ते लोक महाराजाविरुद्ध फिर्यादी बनले होते आणि त्यांच्यावर आणखीं जुलूम होऊं नये म्हणून त्यांना पोलिटिकल एजंटचा आश्रय होता असें विक्षिप्तकार म्हणतात. मग भाव वाढवून माल घेण्यांत त्यांच्यावर जुलूमच झाला ह्मणावयाचा ! शिवाजी महाराजांना खोटें सहन होत नाहीं यामुळें ज्यांना ते विश्वासाचीं कामें देतात ते जेव्हां बेमान होतात तेव्हां महाराजांना संताप येतो, हें आह्मीं नाकबूल करीत नाहीं; परंतु विक्षिप्तानीं तर सर्व अपराध्यांस इमानी ठरवून शिवाजीरावांस जुलमी ठरविण्यास आकाश पाताळ एक करून सोडलें आहे. कांहीं गोष्टी विक्षिप्तानीं अशा लिहिल्या आहेत कीं त्या मनुष्यस्वभावाच्याच नाहींत आणि तशा गोष्टी करण्याची फक्त ठग, लूटारू व चोर लोकांसच प्रवृत्ति होते. अशा गोष्टी लिहून विक्षिप्त स्वतःच्या पूर्वाश्रमाची ओळख लोकांस करून देत आहेत. अपराध्यांस स्वतःच्या बचावांत पुरावा देता यावा अशासाठीं महाराजांचे यत्न आहेत व त्यांची चौकशी लवकर व्हावी अशी महाराजांची इच्छा असते इतकेंच नव्हे तर अंमलदारानें महाराजांस खरा प्रकार कळविला तर ते विचार केल्यावांचून राहत नाहींत अशाविषयीं खुद्द विक्षिप्तकारांच्या लेखांत आधार सांपडतात. विक्षिप्तकार म्हणतात कीं वामन सिताराम याची चौकशी करून लवकर निकाल कळवा, अशी चिठ्ठी महाराजांनीं स्पेशल मॅजिस्ट्रेट रानडे यांस लिहिली. विक्षिप्तकारांची इच्छा लवकर निकाल होऊं नये अशी दिसते. महाराजांना जर वामन सितारामावर जुलूम करावयाचा होता तर असा हुकूम लिहिण्याची व चौकशी करण्याची काय जरूर होती ? आणि जुलूम

करणाऱ्याला चौकशी करण्यासाठीं मुकद्दमे मॅजिस्ट्रेटाकडेस पाठविण्याचें तरी काय कारण आहे? स्पेशल मॅजिस्ट्रेटच्या नेमणुकीबद्दल महाराजांचा खरा हेतू असा आहे कीं ज्या कामाची चौकशी जिल्ह्यांत अथवा कायमच्या कोर्टांत होण्यास दिवसगत लागतात अशीं कामें पडून राहूं नयेत त्यांचे निकाल लवकर व्हावेत; ह्यासाठीं ही नेमणूक केली आहे. कामाचा निकाल लवकर लावण्यास अशा नेमणुकी इंग्रेजी राज्यांत होतात. सरळ समजुतीनें गोष्टी समजून अथवा अनुमानाचा उपयोग साजेल तसा करून वागण्याचें ज्ञान नसलें ह्मणजे अर्थवैचित्र्याची अशीच मजा होते. विक्षिप्ताच्या विरुद्ध जे लेख इतर वर्तमानपत्रांतून येतात, ते लेख शिवाजी महाराज लिहवितात असे विक्षिप्त ह्मणतात तर "महाराजांचा असा बेत आहे, महाराज कारभाऱ्याशीं असें बोलले, महाराजांनीं प्रथम असा मसूदा केला मग तो बदलला" वगैरे गोष्टी विक्षिप्त पत्रांत येतात त्यावरून ज्यांच्याशीं महाराज बोलले अथवा ज्या कामांत महाराजांचा आणि ज्या व्यक्तिचा संबंध आहे त्यानें स्वतः विक्षिप्तास ती बातमी दिली असेंही ठरतें आणि मग विक्षिप्तांतील बातम्या अपराधी वर्गाच्या पक्षाच्या असल्यानें त्यांत खरेपणा नाहीं हें चांगलें निष्पन्न होतें. शिवाजी महाराजांच्या विरुद्ध कांहीं तरी लिहिलेंच पाहिजे ह्मणून विक्षिप्तानीं महाराज **माच** पाहतात ह्मणून दोन कॉलम्स त्यावरच लिहिले आहेत. फालगुनाचे तमाशे, व इंग्रेज लोकांचे बॉल; त्याचप्रमाणें करमणूक ह्मणून **माच** आहे. आणि हा तमाशा फाल्गुनांतील आहे. इकडे महाराज माच पाहतात ह्मणून विक्षिप्तास वाईट वाटतें आणि तिकडे रंड्यांना बाळविलें ह्मणून त्यांचा कैवार विक्षिप्त घेतात. यावरून विक्षिप्ताना चांगलें आणि वाईट यांतील भेदही कळत नाहींत. विक्षिप्तांच्या बुद्धीप्रमाणें शिवाजी महाराजांचे पुष्कळ जुलूम लिहावयाचे राहिले आहेत. इंदूर राज्यांत जनानखान्याची पद्धत आहे ह्मणून स्त्रिया गुदमरून मरतात, त्यांना मडमीसारख्या स्वतंत्र करीत नाहींत. महाराजांच्या वाड्यांत जातांना जोडे काढावे लागतात ह्मणून आमचे पायाला गालीचे खुपतात; रंगपंचमीचे दरबारांत लोकांवर रंग व गुलाल टाकण्यांत येतो, यामुळें लोकांना सर्दी

होते; दिपवाळीचे प्रतिपदेला रेडे व मेंढे ळदविले जातात; यांत मुक्या जनावरांना निर्दयपणानें वागविण्यांत येते. दसऱ्याला बकरीं व रेडे यांचा बळी देतात; चोरट्यांना शहरांत चोरी करूं देत नाहींत. विक्षिप्तकारास व त्यांचें आप्त सहोदर इष्टमित्र शिंत्रे, तारे, भानु वगैरे लोकांस खजीना लुटूं देत नाहींत. महाराज स्नानाला पाणी फार वापरतात, बिचाऱ्या पाणक्यांना त्रास होतो; उन्हांत बाहेर निघतात व शिकारीला जातात, नोकर माणसांना उष्णता होते; फौजेंतील लोकांना मोठ्या पाहाटेस कवाइतीसाठीं उठावें लागते, त्यांची झोंप मोडते; अशी शेंकडों उदाहरणें त्यांच्या जुलमाचीं दाखविणें राहिलीं आहेत. विक्षिप्तांच्या एकतर्फी व तरकटी लिहिण्यांत सुद्धां आपणांस त्याच्या मतें निरपराधी ठरलेल्या लोकांनीं कशीं कामें केलीं आहेत, तीं पाहतां येतात. वामन सिताराम याचे संबंधानें विक्षिप्तानें लिहिले आहे तेच शब्द आह्मीं येथें देतों.

"राजेश्री गोपाळराव भैयांच्या कंपाउन्डांत मातीचा ढीग पडला होता; हुजूर हुकुमान्वयें ती माती फालतु पडली असून जागजागीं खड्डे भरण्यांत घातली व लोकांसही ज्यांनीं मागितली त्यांस दिली त्याप्रमाणें वामनराव यानींही मॅनेजरच्या परवानगीनें थोडीशी नेली. तेव्हां मातीची चोरी केल्याचा तिसरा अपराध त्यांचें माथीं बसला" आतां विक्षिप्तकारांच्याच लिहिण्यावरून विचार करूं. वामन सिताराम हा म्युनिसिपालटींत नोकर होता आणि त्याच्याकडे ह्या मातीची व्यवस्था अमुक रीतीनें लावण्याचें काम असतां त्यानें ती स्वतःच्या येथें कां नेली? मॅनेजरच्या परवानगीनें नेली असें ह्मणण्यांत परवानगीवांचून माती नेली तर माझे शिरीं अपराध येईल ही समजूत वामनरावाची झाली होती असें निष्पन्न होते. विक्षिप्तकारास जर महाराजांचा जुलूम कळून चुकला आहे तर इंदूरांत राहणाऱ्या व सरकार नोकरी करणाऱ्या वामन सितारामाच्या मनांत अशी कल्पना येणें फार स्वाभाविक आहे; आणि वामन सिताराम याला जर मॅनेजरनें माती नेण्यास परवानगी दिली होती तर ज्या अर्थी महाराजांच्या चिठ्या व हुकुमाचे उतारे मि. विक्षिप्त

यांनीं दिले आहेत त्या अर्थी त्या परवानगीच्या नंबर तारखेचा तरी निदान खुलासा केला पाहिजे होता तो कां केला नाहीं? माती नेण्यांत लेखी परवानगी काय विचारायची आहे असें ह्मटलें तर मातीसाठीं विचारायचे तरी काय आहे हें ह्मणणें कां शोभूं नये ?

वामनरावानीं माती नेली ती परवानगीनें नेली असें दाखविण्याचा प्रयत्न विक्षिप्तानीं केला त्यावरून आज जरी दुसरी खरी बाजू वाचकांपुढें ठेविली नाहीं तरीपण इतका अंदाज करतां येईल कीं, त्यानें ती माती एक दोन टोपल्या नेली नसेल, तर स्वतःचें घर बांधण्यापुर्ती नेली आणि तसें करण्यांत त्यानें सरकारी गाड्या दिवसभर कामीं लाविल्या. यांत गाडी, बैल, गाडीवाला वगैरेचा खर्च सरकारांत पडला आणि घर वामनरावाचें तयार झालें अशा गोष्टी करण्यास लेखी परवानगी घेण्याची कल्पना त्याला आली पाहिजे होती; असा त्याचा त्या कामाशीं संबंध होता; या मातीचा संबंध, वामनरावाचें घर बनलें त्याच्याशीं राहतो हें या खालीं विक्षिप्ताचा अक्षरशः उतारा घेतला आहे त्यावरून खास ठरतें; त्यांत सुतार, राज ( गंवडी अथवा कडिया ), मजूर, वामनरावानें घरीं कामास नेले असें साफ आहे. "म्युनिसिपालिटींत पाहिजे त्या नोकर कारागीरास काम पडेल त्यानें न्यावा व त्याची मजूरी म्युनिसिपालिटींत भरावी व तितके दिवस म्युनिसिपालिटींत त्याची गैर हाजरी मांडली जावी अशी रीत आहे व त्याप्रमाणें केलेंही जातें. पुष्कळ सुखवस्तु लोक अशा कारागीरांस आपल्या कडे नेऊन आपलीं कामेंही करून घेतात व ही परवानगी इतराप्रमाणें म्युनिसिपालिटींचे मॅनेजर व दुसरे नोकर यानाही आहे व त्यांनीं अनेक वेळा उपयोग ही केला आहे. त्याप्रमाणें वामनराव यानें कांहीं सुतार, राज, मजूर आपल्या घरीं कामास नेले व त्यांची मजूरी कांहीं दिली व कांहीं देणें राहिली ती त्याचे नांवें म्युनिसिपालीटीचे हिशेबांत लिहिली असून त्याजवर मॅनेजरची सही देखील आहे. त्याप्रमाणें दुसरें सामान जें म्युनिसिपालिटींतून उधारीनें व रोखीनें विकलें जातें त्याजबद्दलचीं पुष्कळ खातीं आहेत त्यामध्येंच वामनराव यानें जे सामान नेलें त्याचेंही एक खातें असून त्यावर मॅनेजरची सही आहे, असें

असतां वामनरावाचें विश्वासघाताचें कृत्य समजून त्याजवर विश्वासघात केल्याचा गुन्हा लागू झाला" विक्षिप्तकारास वामन सितारामास निरपराधी ठरविण्यास रीत आहे हें चांगलें कळतें. ह्याचसाठीं आह्मीं ह्मणतों कीं कोठल्याही गोष्टीविषयीं काथ्याकुट करण्यापूर्वीं रीत माहीत करून घेतली पाहिजे. आणि रीतीभातीचें ज्ञान विक्षिप्तकारांनीं करून घेतलें असतें ह्मणजे महाराज जुलमी आहेत असें ह्मणून त्यांनीं स्वतःच्या तोंडाला काळीमा लावून घेतली नसती. वामन सितारामाचे कामांत सुद्धां त्यांना रीत कळली नाहीं. कायदा ठरून रीत नाहींशी झाली ह्मणजे त्या रीतीप्रमाणें केलेलें काम गुन्हा होतो. रीत होती तेव्हां **सती जाणें** हा स्वर्गपंथ मोकळा होता. हल्लीं मोठा अपराध आहे. म्युनिसिपालिटींत वामन सिताराम नोकर असून त्यानें मजूर लोकांचा पगार म्युनिसिपालिटींत न भरतां त्यांना आपल्या घरीं कामास लाविलें आणि त्या नोकरास म्युनिसिपालिटींतून पगार चुकवून दिले. यांत वामनरावानें रीत मोडली. कारण मजूरांना सरकारांतून पैसे दिले गेले आणि वामनरावानीं स्वतःचे खासगत काम या पैशावर करवून घेतलें. जी रक्कम सरकारांतून या मजुरांचा पगार ह्मणून वामनरावानें त्यांना दिली ती रक्कम वामनरावानें स्वतःच्या नांवें मांडून सरकारचें घेणें मजकडेस आहे असें वेळ आल्यास दाखविण्यास आपली तयारी ठेवली. अशी स्थिती म्युनिसिपालिटींतून वामनरावानें माल नेऊन आपलें नांवें त्याची किंमत लिहून खातावहींत मॅनेजरची इतर खात्याबरोबर सही घेवून ठेविली, त्यांत आहे. मुख्य मुद्दा हा आहे कीं, वामनरावानीं त्यानें सरकारांतून माल व मजूर आपल्या कामीं लावून स्वतःच्या नांवें रुपये लिहून ठेविले आणि महिन्याच्या महिन्या स्वतःचा पगार घेत गेली, व सरकारी रुपाया बाकी ठेवला. चोरानें एखाद्याचे घरांत चोरी करावी व चोरलेल्या मालाची यादी तयार करून कोठें तरी एका छपरांत खुपसून ठेवावी. स्वतः धरला गेला म्हणजे त्यानें सांगावें कीं 'पहा, अमुक ठिकाणीं मी सर्व तपशील लिहून ठेविला आहे.' मॅनेजरची सही वहीवर आहे यांत काय मातबरी आहे? कोठला मुख्य ऑफिसर प्रत्येक कच्चें काम पाहून

त्यावर सही करतो? असें काम होऊं लागलें तर एकच मनुष्य आपापल्या खात्याचीं सर्व कामें करूं शकेल. रोजचें चालू काम पुढें आलें म्हणजे सही करावयाचा परिपाठ अथवा रीत आहे. विक्षिप्तकारास ही रीत त्यांच्या छापखान्याचे कामांत माहीत असली पाहिजे. कायद्याचे जाळ्यांत माशासारखे भोळे लोक गुरफटतात आणि कावेबाज लोक त्यांच्यांतून स्वतःची सुटका करून घेतात-तशांतला प्रकार विक्षिप्तकारांना आवडतो. विक्षिप्तानें शिवाजी महाराजासंबंधानें मुद्दाम खोटे लेख लिहिले आहेत यांत संशय नाहीं. इंदूर संस्थान भाग १ पान ७३ यांत "एका बाईचें उद्गार" म्हणून जो मजकूर लिहिला आहे त्यावरून कांहीं लिहायला नसलें म्हणजे एकजण आपल्या घरांत महाराजांस वाईट म्हणत होता, एक जण महाराजास रस्त्यानें शिव्या देत जात होता असें लिहिण्यांत काय मातब्बरी आहे? महाराजांच्या जुलमीपणांचीं म्हणून विक्षिप्तकारानीं बनाऊ स्तोत्रें गायिलीं आणि "असें कळतें, समजतें, ऐकण्यांत येतें." म्हणून त्याच अर्थाचीं मोठमोठीं वाक्यें खरडलीं. तरीपण तृप्ती न होतां 'एका बाईचे उद्गार' म्हणून पुन्हा निनांवी अर्जासारखा लेख लिहिला आहे. कोण बाई, कोणाजवळ, काय मोठा मुद्दा बोलली याचा पत्ताच नाहीं असेंच लिहावयाचें आहे तर एक बाईच कां म्हणावी लागली?

एकेक घरचा एक एक मनुष्य कल्पून प्रत्येकाचें तेंच्या तेंच; बोधरहीत म्हणणें, वाक्य रचना निराळी करून लिहीत गेलें, म्हणजे हल्लीचे विक्षिप्त त्यांना लागलेल्या पिसांमुळें कदाचित् दगावले तरी पण त्यांच्या वंशांत त्याचा हा ठगी आणि डेकॉइटीचा धंदा चांगला चालेल!!

कोल्हापूर प्रकरणांत केसरीकारावर प्रसंग आल्यानें त्यांच्या सत्यप्रीतीविषयीं लोकांत जी तारीफ झाली ती ऐकून अथवा अमृतबजार पत्रिकेच्या एडिटरांनीं संकटें सहन करून मुत्सद्दीप्रकाराचें दिग्दर्शन केलें व देशासाठीं ते झटले त्यामुळें त्यांना जो मोठेपणा मिळतो आहे तिकडे दृष्टी गेल्यानें ह्या विक्षिप्तास वाटलें कीं कोठल्याही कामांत कां होईना एकदां कैद झाली म्हणजेच मोठेपणा मिळतो अशा समजानें 'खरा प्रकार'

त्या मासिक पुस्तकांत एक बीभत्स मजकूर छापून विक्षिप्तकार कर्दत जाऊन आले परंतु त्यांचा लोकांनीं धि:कार केला यामुळें त्यांच्या मनांत अशी इच्छा आहे कीं कोणी तरी एखाद्या राजकीय विषयांत यांना कैद ठोकावी यासाठीं " इंदूराधिश आम्हाला काय विचारतात? त्यांना धमक आहे कोठे ?" अशा वल्गना चालविल्या आहेत परंतु त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं कुतऱ्याच्या जातीची एकदां परिक्षा झाली म्हणजे भोंकणारें कुत्रेंच आहे असें ठरविण्यास त्याचें तोंड पाहण्याची जरूर नाहीं. " उंदीर म्हणतो राजा भ्याला माझी टोपी दिली; घेतली म्हणजे म्हणतो राजा भिकारी, माझी टोपी घेतली " यांतलेच हे विक्षिप्तकार आहेत.

ज्यांना सत्यता शोधावयाची आहे त्याला त्याचे मार्ग मोकळे आहेत परंतु मनुष्याला सर्वज्ञतेचा अहंकार वाहण्याची संवय लागली म्हणजे तो स्वतःचें ज्ञान दाखविण्यास उतावळा होतो. अशा लोकांनीं शिवाजी-महाराजांच्या विरुद्ध ओरड मांडली आहे आणि त्यांच्या पांचजन्या-च्या नांवावर इतर मंडळी नाचूं बागडूं लागलीं आहेत. नुसत्या सुधारणा शब्दाची वाटेल तशी ओढाताण करून स्वातंत्र्याच्या झोंकाखालीं तोंडाची वाफ दवडणारे लोक आहेत त्यांनीं " आह्मांला असें कळलें, आम्हीं असें ऐकतों, महाराजांचा असा हुकूम नसला तरीपण गर्भीत अर्थ हाच आहे, आमची बातमी खात्रीची आहे " असें म्हणून लाजेकाजेस्तव अथवा स्वतःचा पक्ष सिद्ध होत नसला म्हणजे आम्हीं संस्थानांचें हित इच्छितों. अशा बाता झोंकण्यापेक्षां ऐतिहासिक दृष्टच्या मुद्यांचा विचार करून स्थिती रीतीचें प्रमाण बघून अनुमानाचा उपयोग शुद्ध मनोभावानें करून पहावा. इंग्रजांच्या परोपकारी स्वभावाची व जोराची माहिती करून घेऊन त्यांना हिंदुस्थानांतील संस्थानें सुधारण्याचा किती नाद आहे आणि या कामीं त्यांना किती खपावें लागतें याचा शांतपणें विचार करावा. इंग्रजांच्या मनांत जेव्हां एखादी गोष्ट करावयाची असते तेव्हां ते वर्तमानपत्राच्या मतावर अवलंबून रहात नाहींत; त्यांचे पोलि-टिकल ऑफिसर संस्थानिकांच्या जवळ अगदीं चिटकून त्यांची बरी वाईट

स्थिती पाहण्यास डोळ्यांत तेल घालून जागृत असतात; अशा स्थितीत वर्तमानपत्रांनीं **स्वराज्य महत्वाचा** विचार न करितां संस्थानिकांच्या विरुद्ध खोट्यानाट्या बातम्या लिहून अथवा पराचा कावळा करून हिंदुस्थान सरकाराला मुद्दाम त्रास देण्यांत काय अर्थ आहे? हिंदुस्थान सरकारचे संस्थानिकांशीं जे तहनामे ठरले आहेत तिकडे पाहिलें आणि हिंदुस्थान देशांत इंग्रजांनीं हिंदुस्थान सरकारचें पद धारण केलें तेंव्हां-पासूनचा इतिहास चाळून पाहिला तर स्वराज्याविषयीं आपल्या लोकांनीं फार काळजी वाहिली पाहिजे. राज्य करणारी व्यक्ति बदलून त्य राज्याचे हक्क तसेंच कायम राहिले आहेत अशी गोष्ट फार क्वचि सांपडेल. यासाठीं यदाकदाचित् मनुष्यस्वभावाला अनुसरून एखाद्या माणसा कडून चूक घडलीं तर त्याला सुधारण्यास आपण घरचेच लोक बस आहोंत. इंग्रजांनीं आपणास विद्यामृत पाजून आपलें बरें वाईट कळ-ण्याचीं साधनें आपणास उपलब्ध करून दिलीं, हिंदुस्थान सरकाराजव-ळ आणि इंग्लंडच्या पार्लमेन्ट जवळ आपण आपले हक्क मागण्यास विद्यामृतानें योग्य झालों आहोंत असें इंग्लिश लोक स्वतः कबूल करूं लागले आहेत. अशा स्थि[illegible] [illegible]क्षिप्तासारख्या वर्तमानपत्रानीं वाटेल तसे लिहावे आणि त्यावर लोकांनीं कोट्या रचा[illegible] हीं मोठी लाजिर-वाणी गोष्ट आहे. राजे लोकांना स्वतःची छाप बसवून रयत सुखी करण्यास बदमाष लोकांना शासन करावें लागतें हें इंग्रजसरकार चांगलें जाणत आ-हेत. हिंदुस्थान सरकार होळकर सरकारांच्या स्नेहाची व राज्यभक्तिची किंमत जाणतात; आणि ते हेंही जाणून आ[illegible] कीं वेळ प्रसंगीं त्याना साह्य करणाऱ्या राजपुरुषामध्यें शिवाजीराव महाराज होळकर सारखे "निस्पृही, स्वपणा राखणारे, स्वावलंबन करणारे व होळकरांच्या घराण्यातील मानी राजांचेंच" साह्य खरें खरें होईल. आमची खात्री आहे कीं इंग्रेज लोक हलक्या कानाचे व पक्षाभिमानी नाहींत; त्याना स्वतःला राज्य स्थापण्याचा व त्याचा बंदोबस्त करण्याचा नेहमीं प्रसंग आहे या-साठीं शिवाजी महाराजाविरुद्ध एक विक्षिप्त तर काय परंतु इतर पाहि-जे तितक्या लुच्चा लोकांनीं बनावटी पुरावे केले व वाटेल तशा गोष्टी

रचल्या तरी पण अनुभवसिद्ध गोष्टीचें महत्व जाणणार इंग्लिश लोक कदापि फसणार नाहींत.

ज्या लोकांना खऱ्या स्थितीचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा आहे त्यांना तें ऐतिहासीक दृष्ट्या कळावें ह्मणून येथपावेतों हें पुस्तक लिहिलें. दुसऱ्या भागांत विक्षिप्त पत्रकारांनीं जे मुकद्दमे प्रसिद्ध केले आहेत व त्यांनीं ज्या ज्या लुच्या लोकांस साधू बनविण्याची खटपट चालविली आहे व ज्यांनीं शिवाजी महाराजांच्या राजतेजाविषयीं द्वेषबुद्धि धारण केली आहे अशा लोकांच्या हकीकती प्रसिद्ध होतील.

समाप्त.